www.dainikmahabharat.com
RNI No. MAHMAR/2015/64418
jaymahabharat2015@gmail.com

रोड, ट्रेन, पीने का पानी, हाइवेज, कोस्टल रोड, फ्लाईओवर, मेट्रो जैसे एमएमआरडीए के प्रोजेक्ट्स के लिए आज ४ लाख ७ हजार करोड़ का निवेश समझौता हुआ है। नीति आयोग के साथ हमने जो एमएमआर क्षेत्र को १.५ ट्रिलियन डॉलर की इकोनॉमी बनाने का एक रोड मैप तैयार किया है, उसके निवेश के लिए यह एक ऐतिहासिक समझौता है।
**देवेंद्र फडणवीस**

दैनिक
# महाभारत
संपादक – विजयकुमार वाव्हळ

अधिकाऱ्यांनी सरकारच्या हातचं बाहुलं बनून चुकीचं काम केलं तर कशी आफत ओढवते याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे अक्षय शिंदे एन्काउंटरप्रकरणी पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याचा उच्च न्यायालयाचा आदेश. अक्षय शिंदे याला कायद्याने शिक्षा होणं अपेक्षीत असताना केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सरकारनेच पोलिसांकरवी कायदा हातात घेऊन एन्काउंटरच्या नावाखाली त्याचा खून केला आणि आता बळी मात्र पोलिसांचा गेला.
**रोहित पवार**

महाराष्ट्र • बीड (महाराष्ट्र) • दैनिक • मराठी • वर्ष – १० • अंक २३७ • बुधवार दि.०९ एप्रिल २०२५ • किंमत २ रू. • पाने ६

छत्रपती संभाजीनगर, नागपुर, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, कोल्हापुर, अहिल्यानगर, अमरावती, ठाणे, सोलापूर, नांदेड, लातुर, धुळे, जालना, धाराशिव, मुंबई, हिंगोली, परभणी, जळगांव, वर्धा, सातारा येथुन प्रकाशित होणारे मराठवाड्यातील एकमेव दैनिक

# वक्फवरुन हिंसाचार सुरुच!



वक्फ सुधारणा विधेयक लोकसभा आणि राज्यसभेत संमत झालं, राष्ट्रपतींनीही त्यावर संमतीची मोहोर उमटवली. हे सगळं घडल्यानंतर वक्फच्या मुद्दावरून पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबादमध्ये मोठा हिंसाचार उसळला आहे.हे विधेयक मागे घ्यावं या मागणीसाठी आंदोलन करण्यात आलं होतं, ज्याला हिंसक वळण लागले. पोलीस आणि आंदोलकांमध्ये झडप झाली. यावेळी दंगेखोरांनी पोलिसांच्या गाड्यांना लक्ष्य केले. दंगेखोरांनी पोलिसांच्या गाड्यांसह अनेक गाड्यांना आग लावली.

दंगेखोरांनी पोलिसांच्या गाड्यांना प्रामुख्याने लक्ष्य केले. पोलिसांच्या गाड्यांसह सर्वसामान्यांच्या गाड्यांची त्यांनी तोडफोड केली आणि तुफान दगडफेक केली. अल्पसंख्यांक समुदायाने एक मोर्चा काढला होता.जंगीपूर पीडब्लूडी मैदानापासून या मोर्चाला सुरूवात झाली होती. वक्फ विधेयक मागे घेण्यात यावे अशी आंदोलकांची मागणी होती. राष्ट्रीय महामार्ग जाम करायचा असा आंदोलकांनी प्लॅन केला होता.जंगीपूरहून उमरपूरच्या दिशेने हा मोर्चा निघाला असता पोलिसांनी त्यांना वाटेतच अडवले. यावेळी आंदोलकांनी पोलिसांवर हल्ला केला. पोलिसांच्या गाड्यांचा कोळसा आंदोलकांनी पोलिसांच्या गाड्या पेटवून दिल्या.

## चीनच्या वस्तूंवर १०४ टक्के आयात कर, ट्रम्प सरकारचा मोठा निर्णय




जागतिक बाजारपेठेच्या दृष्टीनं मोठी बातमी समोर आली आहे. अमेरिकेकडून चीनच्या वस्तूंवर १०४ टक्के आयात कर लादला आहे. येत्या ९ एप्रिलपासून अतिरिक्त कर वसूल केला जाणार असल्याची घोषणा व्हाईट हाऊसकडून करण्यात आली आहे.

चीनकडून अमेरिकेवर आयात कर लादल्यानंतर ट्रम्प सरकारचा अतिरिक्त कर लावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळं आता चीन आणि अमेरिकेत व्यापार युद्धाचे ढग दिसू लागलेत. जगातील इतर देशांवर देखील परिणाम होण्याची शक्यता आहे.

ट्रम्प यांच्या करवाढीस जशास तसे प्रत्युत्तर देत चीनने कर लादल्यामुळे व्यापार युद्ध भडकले आहे. त्यातच चीनने ही करवाढ मागे न घेतल्यास त्यांच्यावर आणखी ५० टक्के कर लादू असा इशारा ट्रम्प यांनी सोमवारी दिला होता. चीनने अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या या इशाऱ्याचा निषेध करत हे अतिरिक्त ५० टक्के शुल्क म्हणजे 'ब्लॅकमेल' असल्याचे म्हटले होते. जर दोन्ही देशांनी यावर तोडगा काढला नाही आणि ट्रम्प त्यांच्या योजनांना चिकटून राहिले, तर या वर्षी अमेरिकेत आयात केलेल्या चिनी वस्तूंवर एकूण नवीन शुल्क १०४ टक्क्यांवर जाऊ शकते असे सांगण्यात आले होते. यामुळं व्यापार युद्ध वाढू शकते ज्यामुळे महामारीनंतर आधीच सर्वात जास्त झालेल्या नुकसानात भर पडण्याची शक्यता होती. अखेर ट्रम्प सरकारं १०४ टक्के आयात कर लादला आहे.

# देशभरातील राज्यपालांवर 'सर्वोच्च' ताशेरे

नवी दिल्ली (प्रतिनिधी)

सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील राज्यपालांना राज्यातील लोकनियुक्त सरकारांकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्नांवर ताशेरे ओढले आहेत. कोर्टाने स्पष्ट केले की राज्यपालांनी राजकीय कारणांनी राज्याच्या विधानसभांवर आपले नियंत्रण आणू नये. त्यामुळे लोकप्रतिनिधी आणि तेथील जनतेच्या अधिकारांवर गदा येईल. न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांन पीठाने तामिळनाडूचे राज्यपाल आर. प रवी यांच्या विधेयकांना मंजूरीविना प्रलंबित ठेवण्याच्या प्रकरणावर निकाल देताना हे ताशेरे ओढले आहेत.कोर्टाने म्हटले की संसदीय लोकशाहीने स्थापित केलेल्या परंपराचा उचित सन्मान करणे राज्यपालांचे काम आहे. विधानसभेद्वारे व्यक्त होणाऱ्या जनतेच्या इच्छेचा आणि जनतेला जबाबदार असलेल्या निवडून आलेल्या सरकारचा आदर केला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने ही सक्त टीपण्णी केली की राज्यपालांनी राजकीय कारणांनी विधानसभेच्या कामकाजात अडथळे आणू नये.




सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या शक्तींना एक प्रकारे सर्वोच्च सांगत विधानसभेचे सदस्य, लोकशाहीच्या प्रक्रियेंर्गत राज्यातील लोकांनी नियुक्त केलेले आहेत. त्यामुळे त्या राज्यातील लोकांच्या भलाई निश्चित करण्यासाठी चांगल्या प्रकारे तयार आहेत. राज्य विधानसभा ज्यावेळी दुसऱ्यांदा सल्ला विनिमय केल्यानंतर विधेयक जर राज्यपालांकडे आणत असेल तर ते त्यांनी त्याच वेळी मंजूर केले पाहीजे. राज्यपाल तेव्हाच मंजूरी देण्यास विरोध करु शकतात जेव्हा ते विधेयक वेगळे असेल..सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालाच्यावतीने दहा विधेयकांना राष्ट्रपतींसाठी आरक्षित करण्याच्या कारवाईला अवैध आणि मनमानी म्हटले आहे. त्यामुळे राज्यपालांचा हा निर्णय बेकायदेशीर ठरवित रद्दबातल केला आहे. विधानसभांनी मंजूर केलेल्या विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी राज्यपालांना दिलेल्या वेळेच्या मर्यादेत काम करण्याचेही सर्वोच्च न्यायालयाने सुचवले आहे.

## उन्हाने अंगाची लाही लाही, मराठवाड्यात सुर्य आग ओकतोय

बीड : राज्यात सध्या तापमानाचा प्रचंड उच्चांक होत असताना सध्या मराठवाडा चांगलाच तापलाय. कमाल तापमानाचा पारा भयंकर वाढला असून उष्णतेच्या झळांनी नागरिक हैराण झालेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये आज ४०.२ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. तर ४०.७ अंश सेल्सियस परभणीत नोंदवले गेले. लातूर आणि धाराशिवमध्ये ३९ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. येत्या काही दिवसात मराठवाड्याच्या कमाल तापमानात प्रचंड वाढ होणार असून किमान तापमानही २-३ अंशांनी वाढ होणार आहे.

**हवामान विभागाचा अंदाज काय?**

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार पुढील तीन दिवसात मराठवाड्याच्या दक्षिण- पूर्व भागात तूरळक ठिकाणी वादळीवाऱ्यासह हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक ०८ व ०९ एप्रिल रोजी छत्रपती संभाजी नगर व जालना जिल्हयात तूरळक ठिकाणी रात्र उबदार राहील. मराठवाडयात पुढील दोन ते तीन दिवसात कमाल तापमानात हळूहळू १ ते २ अं.से. ने वाढ होऊन त्यानंतर हळूहळू २ ते ३ अं.से. ने घट होण्याची तर पुढील तीन दिवसात किमान तापमानात हळूहळू २ ते ३ अं.से. ने वाढ होऊन त्यानंतर फारशी तफावत जाणवनार नाही.हवामान विभागाच्या इशाऱ्यानुसार, नांदेड, लातूर तसेच धाराशिव जिल्ह्यात हलक्या पावसचा इशारा देण्यात आला आहे.वाढत्या तापमानामूळे व वाढलेल्या बाष्पोत्सर्जनाच्या वेगामूळे पिकात, फळबागेत, भाजीपाला व फुल पिकास आवश्यकतेनूसार सकाळी किंवा संध्याकाळी पाणी व्यवस्थापन करावे. असा सल्ला वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने कृषी सल्ल्याची शिफारस केली



## आजपासून वक्फ कायदा लागू पश्चिम बंगालमध्ये हिंसाचार

मुर्शिदाबाद – मंगळवारपासून देशभरात वक्फ सुधारणा कायदा लागू करण्यात आला आहे. गृह मंत्रालयाने ही माहिती दिली आहे. वक्फ दुरुस्ती विधेयक लोकसभेने २ एप्रिल रोजी आणि राज्यसभेने ३ एप्रिल रोजी मंजूर केले. ५ एप्रिल रोजी राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्यानंतर हा कायदा लागू झाला.तत्पूर्वी, मंगळवारी संध्याकाळी पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबादमध्ये वक्फ कायद्याच्या विरोधात निदर्शने सुरू असताना हिंसाचार झाला. निदर्शकांनी अनेक वाहने पेटवून दिली. यामध्ये पोलिसांच्या वाहनांचाही समावेश आहे. निदर्शकांशी झालेल्या संघर्षात अनेक पोलिस जखमी झाले.

मुर्शिदाबादमध्ये वक्फ कायद्याविरोधात मुस्लिम संघटना निदर्शने करत होती. पोलिसांनी आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली. त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या आणि लाठीचार्ज केला.

जमाव हिंसक झाला. लोकांनी पोलिसांच्या गाड्या आणि इतर वाहनांना आग लावली. यानंतर घटनास्थळी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर झाल्यापासून, सर्वोच्च न्यायालयात आतापर्यंत १२ याचिका दाखल झाल्या आहेत. त्याच वेळी, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने ११ एप्रिलपासून देशभरात निदर्शने करण्याची घोषणा केली आहे.

# डिजिटल शिक्षणाचे धोरण स्विकारणे काळाची गरज-प्रा. राम शिंदे

अहिल्यानगर ।प्रतिनिधी

आधुनिक तंत्रज्ञान युगामध्ये डिजिटल शिक्षण आवश्यक असून डिजिटल शिक्षण धोरण स्वीकारणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले. 'डिजिटल स्कूल' या संकल्पनेअंतर्गत कर्जत तालुक्यातील ८७ व जामखेड तालुक्यातील २४ अशा १११ शाळेतील इंटरॅक्टिव्ह टच पॅनल आणि महाराष्ट्र शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमावर आधारित डिजिटल ई लर्निंग सॉफ्टवेअरचे लोकार्पण सभापती श्री. शिंदे यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आले. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे यांच्यासह जिल्ह्यातील गटविकास अधिकारी, शाळांमधील शिक्षक, विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते.

सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अनेकवेळा 'परीक्षा पे चर्चा' या उपक्रमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांचा आत्मविश्वास वाढवला आहे. शिक्षण हे तणावमुक्त व सृजनशील असले पाहिजे यावर त्यांनी नेहमीच भर दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली डिजिटल शिक्षणाच्या पर्वाची सुरुवात झाली आहे. त्याला अनुसरूनच ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.



आधुनिक तंत्रज्ञानातून विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य साकारले जाणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सर्व विषयांची उकल अत्यंत सुलभपणे होणार आहे. रंगात्मक आणि चित्रकात्मक पद्धतीने विद्यार्थ्यांना विषय समजून सांगता येणार आहेत. फळा, खडू, डस्टर ही संकल्पना नष्ट होत आहे. यापूर्वीही विद्यार्थ्यांना इंटरॅक्युअल बोर्ड, डिजिटल बोर्ड उपलब्ध करुन देण्यात आले असून यानंतरही शाळांना अशाच पद्धतीची शिक्षण व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचेही सभापती प्रा.शिंदे म्हणाले.

शिक्षक हा शिक्षणाचा आत्मा आहे. शिक्षकांनीही आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरणे ही काळाची गरज बनली आहे. शिक्षकांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करुन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत त्यांचे उज्वल भविष्य घडविण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या कलानुसार शिक्षण देण्याची गरज आहे. सृजनशिलतेला आव्हान आणि प्रोत्साहन देणारे हे स्मार्ट बोर्ड विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देणारी जादुई खिडकी आहे. डिजिटल युगामध्ये नवीन काय आहे हे विद्यार्थ्याला पहायला, ऐकायला आणि प्रात्यक्षिक करायला मिळाले तर यातून विद्यार्थ्यांचा शाळेत जाण्याचा उत्साह वाढून त्यांचे भविष्य या माध्यमातून निश्चितच घडू शकेल, असा विश्वासही सभापती प्रा.शिंदे यांनी व्यक्त केला.

आजचे युग हे डिजिटल तंत्रज्ञानाचे आहे. पूर्वीच्या शिक्षण पद्धतीमध्ये आणि आजच्या शिक्षणामध्ये मोठे बदल झाले आहे. आधुनिकतेच्या युगाच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांना टिकायचे असेल तर डिजिटल शिक्षण घेणे अत्यंत आवश्यक आहे. चिकाटी आणि सतत ज्ञान मिळविण्याची भूक असेल तर यातून एक मोठ परिवर्तन घडू शकते. त्यामुळे हे डजिटल शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी पूरक ठरणार आहे. केवळ शिक्षकांनीच नव्हे तर पालकांनीसुद्धा विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्ह्यातील १११ शाळांमधून आपण एकाचवेळी या इंटरॅक्टिव्ह टच पॅनलचे लोकार्पण केवळ डिजिटल तंत्रज्ञानामुळे आपण करु शकत आहोत, हीच या तंत्रज्ञानाची ताकद असल्याचे सांगत हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक आणि पालकांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवत त्यांचे कुतुहल जपण्याचे काम करण्याची गरज आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात अनुकूल परिवर्तन घडविण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले.जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे यांनी प्रास्ताविक केले.विद्यार्थ्यांनी साधला सभापतींशी संवाद इंटरॅक्टिव्ह टच पॅनल आणि डिजिटल ई लर्निंग सॉफ्टवेअरचे लोकार्पण कार्यक्रमादरम्यान जिल्हा परिषद शाळेच्या इयत्ता ६ वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या महेंद्र कोकाटे व प्रवीणराज गलांडे यांनी सभापती प्रा. राम शिंदे यांच्याशी संवाद साधला. इंटरॅक्टिव्ह टच पॅनलबाबत शिक्षकांनी संपूर्ण माहिती दिल्याने सर्व विषय समजण्यास मोठी मदत झाली. डिजिटल शिक्षणामध्ये सर्व विषयांबरोबरच संस्कृत विषयाचा समावेश असल्याने संस्कृत भाषेचे ज्ञान प्राप्त करुन घेण्यात सहजता येत असुन कृत्रिम बुद्धीमत्तेकडे यशस्वीपणे उचललेले हे पहिले पाऊस असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी सभापतींचे आभारही व्यक्त केले.




## गुड न्यूज, यंदा पाऊस सरासरीच्या १०३ टक्के बरसणार

### पाऊस कसा मोजतात?

भारतीय हवामान विभागाने पाऊस मोजण्याच्या पाच श्रेणी ठरवल्या आहेत. सरासरीच्या ९० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस म्हणजे अपुरा पाऊस समजला जातो. दुसऱ्या श्रेणीत ९० ते ९५ टक्के म्हणजे सरासरीपेक्षा कमी पाऊस, तर तिसऱ्या श्रेणीत ९६ ते १०४ टक्के म्हणजे सामान्य सरासरी इतका पाऊस समजला जातो. पुढील दोन श्रेणी सरासरीपेक्षा अधिक म्हणजे १०५ ते ११० टक्के आणि ११० टक्क्यांच्या पुढे अधिक पाऊस म्हणजे सर्वाधिक पाऊस समजला जातो.

नवी दिल्ली ।प्रतिनिधी

भारतातील आघाडीची हवामान विषयक अंदाज करणारी संस्था स्कायमेटनं मान्सून २०२५ साठीचा अंदाज जाहीर केला आहे. स्कायमेटनं मान्सूनचा येणारा हंगाम सामान्य राहील, असा वर्तवला आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीत मान्सूनचा पाऊस सरासरीच्या १०३ टक्के होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामध्ये ५ टक्क्यांची वाढ किंवा घट होऊ शकते. जून ते सप्टेंबर या कालावधीत दीर्घकालीन सरासरी ८६८.६ एमएम पाऊस पडेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

स्कायमेटचे जतिन सिंह यांच्या मते, ला निना या हंगामात कमकुवत आणि संक्षिप्त असेल. ला निनाचे चिन्ह आता धुसर होत आहे.

# किरण वर्मा यांची न्यायाधीश पदी नियुक्ती

## हिंगणा तालुक्यातुन शुभेच्छा चा वर्षाव



हिंगणा /प्रतिनिधी

तालुक्यातील राजीवनगर येथेल गरीब कुटुंबातील तरुणी किरण वर्मा यांनी नुकतीच न्यायधीशाची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली. त्यांचे यश समाजासमोर एक आदर्श आहे त्यांच्या यशाबद्दल नागपूर ग्रामीण महिला काँग्रेसच्या अध्यक्ष कुंदा राऊत यांनी त्यांच्या राजीव नगर निवासस्थानी भेट देत शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

यावेळी जेष्ठ काँग्रेस नेते नवसू गवते हिंगणा विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष फिरोज शेख, अर्जुन वर्मा, सोनू वर्मा, इसासनी उपसरपंच राहुल फुलसंगे, यांच्यासह परिसरातील महिला व युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. यावेळी न्यायाधीश किरण वर्मा यांनी आपल्या संघर्षाची कहाणी उपस्थितांना सांगितली. त्या म्हणाल्या वडिलांनी एका लहान व्यवसायाच्या माध्यमातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करून मला घडविले. पण समाजात मुलींच्या शिक्षणाबद्दल नकारात्मक दृष्टिकोन आहे. गरिबीमुळे अनेकदा माझ्या आई-वडिलांना बोलणे ऐकावे लागले. यात हालाकीच्या परिस्थितीने मला अधिक जिद्दी बनवले. आणि न्यायाधीश बनण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. मी हे यश गाठले इतरांना काय संदेश द्याल असे विचारले असता किरण वर्मा म्हणाल्या की जीवनात कठोर परिश्रमाशिवाय कुठली गोष्ट साध्य करता येत नाही हे वाक्य मी माझ्या मनात कोरले होते हाच मी संदेश इतरांना देत आहे त्यांनीही हा संदेश आपल्या मनात कोरावा आणि परिश्रम करावे माझ्या यशाचे श्रेय मी माझ्या आई-वडिलांना देत आहे

# धानोरा बु.संडास नालीचे घाण पाणी वाहून करतंय देवदर्शन

## प्रशासन दिग्गज नेत्यांच्या धसकीने ठेवलंय तोंडावर बोट?

प्रतिनिधी । बीड

तालुक्यातील धानोरा बु.येथील मुख्य रस्ता आहे तो पुर्ण गावातील साईबाबा मंदिर मसई माता, हनुमान मंदीरा समोरुन संड़ास नालीचे घाण पाणी वाहून सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे.दररोजच हजारो भक्त पायी त्याच घाण पाण्यातुन पाय तुडवत मंदिरात येऊन आरती दर्शन घेतले जातात यात मंदिर व मंदिर परिसर अतिशय दुर्गंधी होत आहे यात प्रशासन मात्र मुग गिळून गप्प! या साईबाबा हनुमान मंदिर समोर अतिशय सुंदर अस सिमेंट कॉन्क्रेट करून प्रांगण केल्याने गावकऱ्यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या पण ४५/: गावातील नाली भरगच्च भरुन तुडुंब भरून भरणीने बुजुन गेल्या असल्याने त्यां नालीचे पाणी मंदिर परिसरात वाहुन देवदर्शन करत असल्याचे चित्र दिसून येत.या वाहत असलेल घाण पाणी लवकर थांबावे अशी संतप्त गावकऱ्यांत चर्चा होत आहे.



धानो-यात सध्या अनेक ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये आरोग्य समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. गटारांची आणि कचऱ्याची योग्य विल्हेवाट न झाल्याने दुर्गंधी येत आहे,लोकांमध्ये नाराजी वाढत आहे.गावात प्रवेश होताच नालीचे पाणी रोडवर, अंगणवाडी बाजुंनी नाल्या तुंबल्या आहेत, ज्यामुळे कचरा रस्त्यावर जमा होत आहे.या घाणीमुळे विद्यार्थीसह नागरिकास आरोग्याच्या समस्या वाढण्याची भीती आहे, कारण कुजलेल्या कचऱ्यातून दुर्गंधी येत आहे. ग्रामपंचायत प्रशासनातून या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी गावकरी करीत आहेत जेणेकरून नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहील.हनुमान मंदीरसह अनेक ठिकाणच्या या गटारांमुळे घाणीमुळे मच्छरांचा उपद्रव वाढला आहे. त्यामुळे गावात ताप, हिवताप- महारोग पसरण्याची भीती लोकांमध्ये निर्माण झाली आहे. आरोग्य विभाग तसेच ग्रामपंचायत प्रशासन यांनी परिस्थितीची जाण ठेवून गावात आरोग्य अबाधित राहण्यासाठी गटारांची आणि घाणीच्या साम्राज्याची विल्हेवाट पावसाळ्या अगोदर लावावी,सध्या मंदिरा समोरील सिमेंट कॉनक्रेट मैदानवर विविध कार्यक्रम करण्यासाठी खुप जागा मोकळी ६०/१००,१५०फिट आहे.पण सध्या पुर्ण नाली संडास चे झुळझुळु वाहत असल्याने कार्यक्रम आयोजित अडथळा निर्माण होतो घाण पाणी वाहून आरोग्य मंदिर घाण होत आहे याकडे प्रशासनाने तात्काळ लक्ष देतील का अशी चर्चा नागरिकांतून होत आहे.

# भिल्ल समाजाचा आक्रोश! स्मशानभूमीसाठी थेट तहसील कार्यालयाच्या दारात प्रेत; प्रशासनाचे दुर्लक्ष

## आदिवासी भिल्ल समाजाचा स्मशानभूमीसाठी थेट धारुर तहसील कार्यालयाच्या दारात प्रेत; प्रशासनाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी । बीड

किल्ले धारूर :- धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण येथील भिल्ल समाजाच्या नागरिकांनी आज (७ एप्रिल) सकाळी ११ वाजता तहसील कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर मृतदेह आणून ठिय्या मांडला. गावाला स्मशानभूमीसाठी जागा मिळावी, या मागणीसाठी संतप्त नागरिकांनी हे पाऊल उचलले आहे. यापूर्वी ग्रामपंचायत सरपंच, पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयांसमोर उपोषण करूनही प्रशासनाने दखल न घेतल्याने नागरिकांचा रोष अनावर झाला आहे.

थेटेगव्हाण येथील आदिवासी भिल्ल समाजाला स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नसल्याने अनेक अडचणी समोर येत आहेत. यासंदर्भात ग्रामस्थांनी वेळोवेळी ग्रामपंचायत तसेच पंचायत समिती स्तरावर निवेदन दिले आणि उपोषणे केली. मात्र, प्रशासनाकडून या गंभीर समस्येकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे आज एका मृत व्यक्तीचे पार्थिव घेऊन नागरिक थेट धारूर तहसील कार्यालयात धडकले आणि प्रवेशद्वारावरच ठिय्या मांडला.

आपल्या न्याय्य हक्कासाठी आणि स्मशानभूमीच्या जागेसाठी नागरिकांनी मृतदेह तहसील कार्यालयाच्या दारात ठेवल्याने एकच खळबळ उडाली आहे. महिला आणि पुरुष मोठ्या संख्येने कार्यालयासमोर जमले असून प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत.आता या गंभीर घटनेनंतर शासन काय



### अनेकवेळा उपोषण करूनही प्रशासनाकडून दखल नाही; थेटेगव्हाण येथील संतप्त नागरिकांचा तीव्र पवित्रा

भूमिका घेते आणि भिल्ल समाजाच्या स्मशानभूमीच्या जागेचा प्रश्न कधी मार्गी लावते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे एका समाजाला आपल्या मृत व्यक्तींसाठीही जागा मागण्याची वेळ आल्याने सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

# अखेर लिंबागणेश येथील स्मशानभूमीचे काम पुर्णत्वाकडे

प्रतिनिधी । लिंबागणेश

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील १२ ते १४ वर्षापुर्वी बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीचे ढासळलेल्या अवस्थेतील बांधकाम आणि उडुन गेलेले पत्रे यामुळे दुरावस्था झाली होती त्यामुळे पावसाळ्यात अंत्यसंस्कार करण्यासाठी मोठी अडचण निर्माण होऊन मृतदेहाची हेळसांड होत होती. नविन स्मशानभूमी बांधण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सहकारी विक्रांत वाणी,कृष्णा वायभट,आरूण ढवळे यांनी ढासळलेल्या बांधकामावरच सरण रचुन ठिय्या आंदोलन केले होते. त्याची दखल घेत आ.संदिप क्षीरसागर यांनी जिल्हा वार्षिक (दहन/ दहनभुमी) जनसुविधा विशेष अनुदान योजनेंतर्गत मुलभूत सुविधांसाठी सन २०२२-२३ आर्थिक वर्षाकरीता ग्रामपंचायत लिंबागणेश येथे स्मशानभूमी बांधकाम व सुशोभीकरणासाठी ८ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करत प्रशासकीय मान्यता दिली होती. आता काम पुर्णत्वाकडे गेले असुन नविन स्मशानभूमी पावसाळ्यात होणारी मृतदेहाची हेळसांड थांबणार असल्याने ग्रामस्थांनी याबद्दल समाधान व्यक्त केले असुन उर्वरित पेलव्हिक ब्लॉक,पाण्याचा हौद, संरक्षक भिंत आदी कामांसाठी पाठपुरावा करणार आहोत.

## स्मशानभूमीत सरण रचुन केलेल्या ठिय्या आंदोलनाचे यश :- डॉ.गणेश ढवळे



बीड जिल्ह्यातील १३९४ गावातील स्मशानभूमीची दुरावस्था असुन ६५६ लहान मोठ्या गावात स्मशानभूमीची सोयच नाही. त्यामुळे पावसाळ्यात मृतदेहाची हेळसांड याबरोबरच अंत्यसंस्कार रोखल्याने गावात वादविवाद होण्याच्या घटना घडत आहेत. काल दि.७ सोमवार रोजी धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण येथील भिल्ल समाजातील संजय नामदेव माळी यांचा मृतदेह धारूर तहसील कार्यालयासमोर ३ तास ठेवण्यात आला होता. यापुर्वीही केज तालुक्यातील सोनेसांगवी( सुर्डी) येथील ४ महिन्यात ३ मागासवर्गीय महिलांचा अंत्यसंस्कार रोखल्याने तहसील कार्यालयात मृतदेह आणुन ठेवला होता.तर गेवराई तालुक्यातील सुशी वडगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर मृतदेह ठेवण्यात आला होता तर बीड तालुक्यातील पालवण याठिकाणी अंत्यसंस्कार रोखल्याने भांडणे होऊन अट्रसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. गेल्या ३ वर्षांपासून आम्ही शासन दरबारी निवेदने तसेच लक्ष्यवेधी आंदोलनाद्वारे स्मशानभूमीची सोय करण्याची मागणी करत आहोत.परंतु प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांना याचे सोयरसुतक नसल्याचे दिसून येते.अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी बोलून दाखवली.

# फुले शाहू आंबेडकर उधान कृती समितीच्या वतीने स्वच्छता अभियान विविध कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.. गणेश वाघमारे यांचे आवाहन

धाराशिव : फुले शाहु आंबेडकर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था धाराशिव संचलित फुले शाहु आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने युगप्रवर्तक विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य म.ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असुन आज रोजी नगर परिषदेच्या माध्यमातुन फुले शाहु आंबेडकर उद्यान कृती समितीच्या नियोजित मोकळ्या जागेत स्वच्छता अभियान राबविण्यात आले,गतवर्षी प्रमाणे याही वर्षी समितीच्या वतीने आकर्षक अशा देखाव्याचे सादरीकरण करण्यात आले असुन त्याचे काम चालु आहे,दि.११ एप्रिल रोजी या देखाव्याचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असुन या दिवशी शासकीय योजनांचा मेळावा, महामानवांच्या जीवन कार्यावरील चित्र प्रदर्शन भरविण्यात येणार आहे,दि.१२ एप्रिल रोजी आरोग्य शिबीर,दि.१३ एप्रिल रोजी गुणवंतांचा सत्कार,दि.१४ एप्रिल रोजी युगप्रवर्तक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम,भोजनदान सकाळी ११ ते रात्री १२ पर्यंत ठेवण्यात आले आहे,या कार्यक्रमाचा आपण सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन गणेश वाघमारे यांनी केले आहे.स्वच्छता अभियानात फुले शाहु आंबेडकर उद्यान कृती समितीचे गणेश वाघमारे,बलभीम कांबळे, संजय गजधने,संपतराव शिंदे,स्वराज जानराव,अतुल लष्करे,पप्पु सरवदे,नगर परिषद स्वच्छता विभाग अधिकारी गणेश महेर,सागर प्रधान,राजेंद्र पेठे,सफाई कर्मचारी महिला भगिनी व बांधव उपस्थित होते.



# अंजना स्कूल ऑफ एक्सीलेंस शाळेत मोफत जे.ई.ई., नीट, एम.एच.सीईटी.चे डेमो वर्ग

फुलंब्री / सुधाकर जेठे
(दै:महाभारत)

छत्रपती संभाजी नगर आसेगाव अंजना अकॅडमी कडून गएए /छएएढ / चक्ढ उएढ साठी मोफत डेमो क्लासेस दिनांक ७एप्रिल २०२५ पासून २२ एप्रिल २०२५ पर्यंत आयोजित करण्यात येत आहेत. याची वेळ सकाळी ८:०० ते दुपारी १२:०० वाजेपर्यंत असून या संधीचा अधिकाधिक लाभ घ्यावा या वर्गामध्ये विद्यार्थीच्या डेव्हलपमेंटसंदर्भात करिअर मोफत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी ही सुवर्णसंधी गमावू नये आणि शहरातील सर्वोत्तम फॅकल्टीकडून आपल्या भविष्यासाठी योग्य दिशा मिळवावी व यशस्वी व्हावे असे संस्थेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे. बस सुविधा पुढील ठिकाणांहून उपलब्ध आहे असेगाव, करोडी, माळीवाडा, खुलताबाद, दौलताबाद, पडेगाव, कसाबखेडा, गाजगाव, लासूर, टाकळी, अंबेगाव, पाचपीरवाडी, शाहपूरबांजर, फतियाबाद, खिर्डी, मौसळा, मिटमिटा, अंबेलोहळ, एकलहरे, पिंपळगाव, जांभळा, गोकुळवाडी. या ठिकाणाहून बस व्यवस्था करण्यात आलेली आहे. तर बाहेर गावाहून येणाऱ्या विध्यार्थ्यांसाठी क्लासेससाठी डेमो मोफत वसतिगृहाची सुविधा उपलब्ध केलेली आहे. याचे ठिकाण: अंजना स्कूल ऑफ एक्सलन्स, गट क्र. ६, तळेसमान, फतियाबाद, आसेगाव रोड, ता. गंगापूर, जि. छ. संभाजीनगर येथे होणार आहे. ४३१००२ विध्यार्थी यांनी संपर्क: ७७५८८४९९९७८८८८६०९५५ // ७७२१९९४७७७ असुविधा झाल्यास उपरोक्त संपर्क नंबर वर संपर्क करावा असेही आवाहन आसेगाव स्कूल ऑफ एक्सलन्स शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.




## बोधडक

### गॅस दरवाढ...!

सबसिडी तर बंदच झाली
गॅस दरवाढ सुद्धा होतेय,
सर्वसामान्यांचा खिसा सरकार
दिवसेंदिवस कमी करतेय..!

दुष्काळात तेरावा महिना यावा
असेच काहीसे घडत आहे,
महागाईचा आगडोंबापुढे प्रत्येक
जण गुढगे टेकत आहे..!!



-प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४४

दैनिक जय महाभारत
संपादक - विजयकुमार वाव्हळ
हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक - विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई - बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड - ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com * टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्री मंगलनाथ संस्थेचे यशस्वी २५ वे वर्ष

## श्री मंगलनाथ मल्टीस्टेट ला झिरो नेट एन.पी.ए सह १४ कोटी नफा

माजलगाव : अमर साळवे
(दै.महाभारत)

श्री मंगलनाथ मल्टिस्टेटला मार्च २०२५ अखेर १४ कोटी नफा प्राप्त झाला असून नेट एन.पी.ए झिरो करण्यात यश प्राप्त झाले आहे संस्थेला २५ वर्षे सभासदांच्या सेवेत पूर्ण झाली आहेत संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सभासद,हितचिंतक,नागरिक यांच्या विश्वासास सदैव पात्र राहुन घवघवीत यश संपादन करत १४ शाखांच्या माध्यमातून ५०२ कोटी व्यवसाय यशस्वी पूर्ण केला आहे. संस्थेने गेली २५ वर्षात सभासदांच्या अपेक्षा जाणून कार्य केले आहे त्यामुळे सभासदांचा बहुमूल्य प्रतिसाद प्राप्त करून गेली २५ वर्ष संस्था अविरत अखंड कार्य करत आहे. संस्थेने ग्रामीण भागापासून ते शहरी भागात शाखांचा विस्तार केलेला असून सर्व शाखा या नफ्यात आहेत. मराठवाड्यातील सर्वात जास्त सोने तारण कर्ज वाटप करणारी एकमेव संस्था म्हणून संस्थेचे नाव लौकिक आहे संस्थेची प्रतिमा कायम ठेवून



संस्थेने आखलेल्या १००० कोटी व्यवसाय पूर्ततेच्या अनुषंगाने काम करत येणाऱ्या काळात अल्प व्याजदरात जास्तीजास्त सोनेतारण कर्ज वाटप करून सभासदांच्या ठेवीना अधिकाधिक सुरक्षा देण्याचा मूळ उद्दिष्ट संस्थेचा आहे.

संस्थेचे अध्यक्ष मा.आर.जी.कानडे यांनी या यशाबद्दल माध्यमांशी बोलताना सांगितले कि, संस्थेने केवळ व्यवसाय वाढीस व नफा वाढीस प्राधान्य न देता विश्वासाहर्ते बरोबर पारदर्शक व्यवहारास प्राधान्य देऊन संस्थेच्या सभासदांच्या ठेवीना सुरक्षा निर्मितीकरीता अल्प व्याजदरात सुरक्षित कर्ज वाटपास नेहमीच प्राधान्य दिले आहे. संस्थेचे मार्च २०२५ अखेर संस्थेच्या ३०० कोटी ठेवी व एकूण २०२ कोटी कर्ज वाटप आहे त्यामध्ये सुरक्षित सोनेतारण कर्ज ,वेअरहाऊस कर्ज ,मुदत ठेव कर्ज अधिकाधिक वाटप असून एकूण कर्जवाटपाच्या ९९.२४ टक्के कर्ज हे सुरक्षित आहे त्यामुळे निश्चितच सुरक्षित कर्ज वाटपाच्या माध्यमातून सभासदांच्या ठेवीना सुरक्षा कवच निर्माण केले आहे. तसेच संस्थेने कर्ज वसुलीत देखील यश संपादन करून नेट एन.पी.ए ० झिरो केला आहे संस्थेची एकूण गुंतवणूक १०२ कोटी आहे. तर संस्थेचा स्वनिधी ४० कोटी तर खेळते भांडवल ३३० कोटी आहे. या आर्थिक वर्षात संस्थेद्वारे ६९९३ कोटीपेक्षा अधिक उलाढाल करून ग्रामीण भागातील अर्थकारणाला चालना देण्याचे काम संस्थेने केले आहे. सर्व तरतुदी व खर्च वजा जात निव्वळ नफा ५.२८ कोटी झालेला असून सदरील नफ्यातून सभासदांच्या हिताच्या दृष्टीने विविध योजनां राबवण्याचा मानस संस्थेने आखलेला आहे तसेच संस्था स्थापनेपासून १२% लाभांश सभासदांना देते या पुढे देखील सभासदांना १२% प्रमाणेच लाभांश देण्याचा दृढ निश्चय संस्थेने केला आहे. संस्थेने सभासदांच्या हित जोपासून ठेवीच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत कार्य केले म्हणून सभासदांचा संस्थेवरील सदैव असणाऱ्या विश्वासास पात्र राहत संस्था अखंडित गेली २५ वर्षांपासून सातत्याने सभासदांना आधुनिक तंत्र ज्ञानाचा अवलंब करून जलद गतीने सेवा देत आहे. आणि निश्चितच पुढील काळात देखील संस्था सभासदांच्या गरजा व अपेक्षा पूर्ण करण्यास कटिबद्ध असून सभासदांच्या हिताच्या दृष्टीने कार्य करेल संस्थेच्या या घवघवित यशाबद्दल संस्थेचे सर्व सभासद,हितचिंतक,मित्र परिवार यांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.



# संत रामपाल जी महाराज यांचा अध्यात्मिक जिल्हा सत्संग अहिल्यानगरमध्ये शांतीपूर्ण वातावरणात संपन्न

माहूर (दै.महाभारत)

अहिल्यानगर, ६ एप्रिल – संत रामपाल जी महाराज यांचा अध्यात्मिक जिल्हा सत्संग दिनांक ६ एप्रिल रोजी अहिल्यानगर येथे अत्यंत शांतीपूर्ण आणि भक्तिभावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सत्संगासाठी परिसरातील आणि राज्यभरातील शेकडो भक्तांनी उपस्थिती लावली होती. सत्संगात भक्तांनी मोठ्या श्रद्धेने भाग घेतला आणि अध्यात्मिक ज्ञानाचा लाभ घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात पवित्र कविर्देव यांच्या अमृतवाणी पठणाने झाली. त्यानंतर संत रामपाल जी महाराज यांच्या शास्त्राधारित प्रवचनाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. त्यांनी आपल्या प्रवचनातून मानवी जीवनाचे खरे उद्दिष्ट, सत्संगाचे महत्त्व, आणि मोक्ष प्राप्तीचा मार्ग याबाबत सखोल मार्गदर्शन केले. वेद, श्रीमद्भगवद्गीता, कुराण शरीफ, बायबल, आणि गुरु ग्रंथ साहिब या प्रमुख धार्मिक ग्रंथांचा दाखला देत त्यांनी एकेश्वरवादाचे समर्थन केले.

या सत्संगामध्ये अनेक भक्तांनी आपल्या जीवनातील परिवर्तन अनुभव कथनाद्वारे शेअर केले. त्यांनी सांगितले की संत रामपाल जी महाराज यांच्या उपदेशानुसार जीवन जगल्यामुळे त्यांचे व्यसनमुक्त जीवन झाले, घरगुती कलह दूर झाले आणि मानसिक शांती प्राप्त झाली.सत्संग दरम्यान नामदीक्षा घेण्याची विशेष व्यवस्था होती, ज्यामध्ये अनेक नवभक्तांनी नामदीक्षा स्वीकारली. याशिवाय सर्वांसाठी ग्रंथ, पिण्याच्या पाण्याची सुविधा, आणि आरामदायक बसण्याची व्यवस्था आणि पार्किंग व्यवस्था करण्यात आली होती. सर्व कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध रीतीने पार पडला.या सत्संगाचा मुख्य उद्देश समाजात अध्यात्मिक जागृती निर्माण करणे, अंधश्रद्धा आणि कुप्रथा दूर करणे, तसेच एक प्रेममय, शांततामय समाज निर्माण करणे हा होता. अहिल्यानगरमध्ये पार पडलेला हा अध्यात्मिक सत्संग एक प्रेरणादायक आणि शांतीदायी अनुभव ठरला.



# सावता प्रतिष्ठानचे उपक्रम इतरांसाठी आदर्श ठरावेत–सिव्हिल सर्जन डॉ. संजय राऊत

बीड / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

माळी समाजाच्या लोकवर्गणीतून उभा राहिलेले सावता प्रतिष्ठान हे अल्पावधीतच उपक्रमशील होत आहे.या प्रतिष्ठान वरचे उपक्रम हे इतरांसाठी आदर्श ठरावेत समाजात कर्तव्यपरायणता, सहिष्णुता,सौहार्द, शांतता आणि एकात्मता निर्माण करण्यासाठी येथे विविध कार्यक्रम राबविले जावेत. श्री संत सावता महाराज यांचे मंदिर प दोन महिन्यानंतर लोकार्पित होणार आहे. त्यामुळे सर्व समाजाच्या सामाजिक धार्मिक कार्यक्रमासाठी हे मंदिर आणि सभागृह खुले होईल असा विश्वास बीड जिल्हा रुग्णालयाचे नवनियुक्त सिव्हिल सर्जन डॉ.संजय राऊत यांनी व्यक्त केला.

डॉ. संजय राऊत यांची नुकतीच जिल्हा रुग्णालयाच्या सिव्हिल सर्जन पदी नियुक्ती झाल्याबद्दल येथील श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्टच्या वतीने त्यांचा सपत्नीक हृद्य सत्कार करण्यात आला.सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सावता परिषदेचे जिल्हाध्यक्ष किशोर राऊत हे होते.यावेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष श्री बाबुराव दुधाळ, नगरसेवक विशाल घाडगे, नगरसेवक शुभम धूत,नगरसेवक अमृतकाका सारडा, डॉ. अक्षय भोपळे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री उद्धव राऊत, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, समता परिषदेचे नितीन राऊत, डॉ. चौधरी इ. मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात किशोर राऊत म्हणाले की मंदिर आणि सभागृह संपूर्ण समाजाचे व्यासपीठ बनले आहे. लवकरच हे मंगल कार्यालय बनेल. माळी समाजाने गट,तट,संघटना आणि पक्ष विरहित येथे एकत्रित आले पाहिजे. प्रतिष्ठानच नावलौकिक केला पाहिजे. आर्थिक सहकार्य केले पाहिजे. सर्व समाजाने हे केवळ मंदिर नसून आपल्या समाजाचे बळ ,अस्मिता आणि प्रेरणास्त्रोत असे समजून सकारात्मक राहून येथील उपक्रमांना उपस्थित राहुन सहकार्य केले पाहिजे.

याप्रसंगी सर्वश्री विशाल साळुंके, उद्धव राऊत, शुभम धुत,अमृतकाका सारडा तसेच सौ आशा गोरे यांची समायोजित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्याम घाडगे यांनी तर प्रास्ताविक प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.रणजीत आखाडे यांनी केले. याप्रसंगी ट्रस्टचे सर्व विश्वस्त मंडळ आणि माळी समाजातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# जिल्हाध्यक्ष पदासाठी स्पर्धा लागणे हे महामंडळाचे यश प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार

निफाड ।रामभाऊ आवारे
(दै.महाभारत)

महाराष्ट्र नाभिक महामंडळ विदर्भ विभागीय बैठक भंडारा महाराष्ट्र नाभिक महामंडळ विदर्भ विभागीय बैठक जे के सभागृह वैशाली नगर भंडारा येथे संपन्न झाली. १९८१ साली स्थापन झालेल्या महामंडळाचा उद्देश हा खेड्या पाड्यांमध्ये वाडी वस्तीमध्ये खितपत पडलेल्या आपल्या नाभिक समाजाला प्रतिष्ठा मिळवून देणे हा होता. आजही जिल्हास्तरीय, तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी या गोष्टीवर काम करण्याची गरज आहे. महाराष्ट्राचे शेवटचे टोक असलेल्या या जिल्ह्यामध्ये जिल्हाध्यक्ष आणि तालुकाध्यक्ष पदासाठी स्पर्धा लागते हे खऱ्या अर्थाने चाळीस वर्ष महामंडळाने केलेला कामाचे फलित आहे. एखाद्या संघटनेचा जिल्हाध्यक्ष पद आपल्याकडे यावे म्हणून वाडी वस्ती वरती जाऊन समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी काम करणे हे त्या संघटनेचे खरे यश आहे. आणि आज भंडारा जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या मध्ये महामंडळामध्ये काम करण्यासाठी जी चढाओढ लागलेली आहे ती कै.हणमंतराव साळुंखे तात्या,ना भू संगमवार, शंकरराव जगताप, बिहारचे तात्कालीन मुख्यमंत्री भारतरत्न जननायक कर्पुरी ठाकूर, आदरणीय प्रभाकर फूलबांदे, अंबादास पाटील, पांडूरंग चौधरी, सुमनताई पवार, बाळासाहेब तावरे यांनी अव्याहतपणे ४५ वर्षे



केलेल्या कामाची पोचपावती आहे. त्यातून हे सिद्ध होते. सर्वसामान्य नाभिक समाजाचे खूप प्रश्न आहेत.आम्हाला आमच्या तील एका सक्षम राजकीय नेतृत्व तयार होण्याची, शासकीय योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याची, स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ करण्यासाठी, राजकीय पुढारी आपल्या संवंग लोकप्रियतेसाठी आम्ही ज्या व्यवसायावर जिवापाड प्रेम करतो,गावगाड्यातील व्यवस्थेने आमच्या वाट्याला दिलेल्या सलुन व्यवसायाची अवहेलना करतात त्यासंबंधी, आमच्या तील हुशार मुलामुलींच्या उच्च शिक्षणासाठी काम करण्याची गरज आहे.अतिशय छोट्या छोट्या गोष्टींसाठी आपण एकमेकांशी वाद करतो,वैरत्व पत्करतो हे बरोबर नाही.आपल्याकडे समाजाच्या उद्धारासाठी देण्यायोग्य जे आहे ते त्यांनी त्यांच्या कुवतीनुसार द्यावे,गरज आहे तिथे समाजाला मदत करावी अशी उपस्थित प्रत्येक नाभिक बंधू भगिनींनी बाळगावी असे आवाहन प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार यांनी यावेळी बोलताना केले.

या बैठकीस प्रदेश सरचिटणीस घनश्यामजी वाघ, माजी प्रदेशाध्यक्ष दत्ताजी अनारसे, प्रदेश कोषाध्यक्ष रामदासजी पवार, प्रदेश उपाध्यक्ष मराठवाडा विष्णूजी वखरे, नागपूर विदर्भ विभाग प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र इंगळे, विदर्भ विभाग अमरावती मंगेश जी माळी, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सुधाकर जी आहेर ,माजी प्रदेश सरचिटणीस दिलीप अनर्थे ,ज्येष्ठ मार्गदर्शक प्रभाकरजी फुलबांधे ,माजी कार्याध्यक्ष अंबादासजी पाटील, नागपूर विभागीय अध्यक्ष डॉक्टर सालोटकर यांच्यासह चंद्रपूर भंडारा नागपूर गडचिरोली वर्धा गोंदिया या जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

समाजाच्या सर्वच प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य करावे तसेच आपली प्रगती सुद्धा ही फार महत्त्वाची आहे हे आपण जागरूकपणे करावी एकमेकांचे हेवे दावे विसरून जावे असे आव्हान त्यांनी केले तसेच यावेळी प्रभाकर फुलबांधे यांनी मार्गदर्शन करताना त्यांच्या अनुभवाचे बोल त्यांनी या ठिकाणी मांडले.यावेळी दत्ताजी अनारसे, रामदास दादा पवार,श्यामभाऊ आस्करकर, विष्णू वखरे,दिलीप अनार्थे यांनी समाजाला संबोधित केले. नागपूर मध्ये कार्य करत असताना ओबीसी च्या आंदोलनामध्ये सुद्धा सहभागी घेतला होता, अनेक मोर्चे आणि निदर्शने तसे या तरुण पिढीने सुद्धा आपल्यावर होणारे अन्याय अत्याचार शासनाविरुद्ध निवेदने देऊन वाचा फोडावी असे आव्हान फूलबांदे यांनी केले .आदरणीय श्री रोशन उरुकूडे यांनी आपल्या कन्येच्या विवाह सोहळ्याचे औचित्य साधून या बैठकीचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व प्रस्ताविक उरुकूडे, मेश्राम,सालोटकर सर केले तर आभार प्रदर्शन श्री अशोक फुलबांधे यांनी मानले.

# जिद्द आणि सातत्याच्या बळावर डॉ.संदेश ने डॉक्टर बनून आई–वडीलाचे स्वप्न केले साकार!

कंधार । धोंडीबा मुंडे
(दै.महाभारत)

कंधार तालुक्यातील फुलवळ येथील अल्पभूधारक शेतकरी संजय भीमराव बोरगावे यांनी आपल्या संघर्षमय प्रवासातही आपला प्रामाणिकपणा , चिकाटी आणि काबाडकष्ट करण्याची प्रवृत्ती सातत्यपूर्णपणे पार पाडत दैनंदिन जीवनात आपण जे दिवस भोगतोय ते भविष्यात मुलांच्या नशिबी असू नयेत यासाठी रात्रंदिवस काबाडकष्ट केले , १९९५-९६ साली त्यांनी आपलं जन्मगाव फुलवळ सोडून तेंव्हाचे औरंगाबाद तर आताचे छत्रपती संभाजी नगर गाठले. तेथे ७५० रु प्रति महिन्याप्रमाणे खाजगी कंपनीत नोकरी चालू केली. कालांतराने संजय व संगीता या जोडप्याला दोन अपत्य झाली. त्यात एक मुलगा संदेश तर दुसरी मुलगी ऋतुजा असे दोन अपत्य झाली.

हळूहळू मूल मोठी होऊ लागली तेंव्हा त्यांना चांगलं दर्जेदार शिक्षण मिळावे अशी या आई-वडिलांची धडपड सुरू झाली. मुलांनाही



शिक्षणाची गोडी लागली , त्यातच जसजसे मूल मोठी होऊ लागली तसतसे त्यांना आपल्या आई-वडिलांचे काबाडकष्ट आणि आपल्या प्रतीची तळमळ दिसून येऊ लागली. याच सर्व गोष्टींचा विचार करत संदेश नेही जिद्दीच्या जोरावर व सातत्याने प्रयत्न करत आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठीचा जणूकाही चंगच बांधला.आणि इयत्ता १२ वी मध्ये व नीट मध्ये भरघोस गुण मिळवत एमबीबीएस साठी स्वतः ची निवड कशी होईल याकडे लक्ष वेधले.

डॉ.संदेश बोरगावे चे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण राजा शिवाजी विद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे घेऊन उच्च माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी भीमाशंकर पाडळकर महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे प्रवेश घेतला. त्यानंतर एमबीबीएस डॉक्टरकीचे शिक्षण घेण्यासाठी त्याची महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स अँड रेसर्च, लातूर निवड झाली आणि प्रवेश ही झाला.बघता-बघता साडेचार-पाच वर्षे कधी गेली कळलेच नाही आणि नुकताच याच संदेश चा डॉक्टरकीचा पदवी दीक्षांत सोहळा मोठ्या थाटामाटात लातूर येथे संपन्न झाला व बोरगावे परिवारातील पहिला डॉक्टर होण्याचा बहुमान त्याच्या नावे नोंद झाला. याचा संदेश सह त्याच्या आई-वडिलांबरोबरच संपूर्ण बोरगावे परिवारात आनंद निर्माण करणारी सुखद घटना डोळ्यादेखत पाहतांना आई-वडिलांचे डोळे आपसूकच आनंदाच्या अश्रूने पान्हावले होते. या आनंदमय दीक्षांत सोहळ्याचे साक्षीदार झाल्याचा आनंद सर्व परिवाराला गगनात मावेनासा होता. यावेळी स्वतः संदेश चे वडील संजय बोरगावे बोलतांना म्हणाले की आज माझ्या कष्टाचे चीज झाले असून आजपर्यंत मी दिवसरात्र केलेले काबाडकष्ट फळाला आल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तर डॉ.संदेश बोरगावे म्हणाले की आपण आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत आपल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेऊन जिद्द आणि सातत्याने प्रयत्न केले तर यश नक्कीच मिळते याचा मला चांगला अनुभव आला असून माझ्या या डॉक्टर पेशाचा गरजू ,गोरगरीब जनतेसाठी नक्कीच निस्वार्थीपणाने व योग्य सेवा देण्यासाठी तत्परपणे व प्रामाणिकपणे प्रयत्न नक्कीच करेन अशी प्रतिक्रिया दिली



# फुलंब्रीत राम नवमी निमित्त महाआरती

फुलंब्री / सुधाकर जेठे
( दैनिक महाभारत )

श्रीरामांचे चरित्र हे आदर्श जीवनमूल्यांचे प्रतीक आहे, असे प्रतिपादन आमदार अनुराधा चव्हाण यांनी रविवारी केले. येथील श्रीराम मंदीर येथे रामनवमी निमित्त महाआरती करण्यात आली. भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, तालुकाध्यक्ष सांडु जाधव, शहराध्यक्ष योगेश मिसाळ, गजानन नागरे, अजय शेरकर, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष वाल्मीक जाधव, सुमित प्रधान, बाबासाहेब शिनगारे सुचित बोरसे गोपाल वाघ उपस्थित होते.

# श्रमिक बहुउद्देशीय संस्थेचा नारीरत्न पुरस्कार सोहळा नाशिक नगरीत लवकरच

## नांव नोंदणी सुरू असुन त्वरित प्रस्ताव पाठवावे



निफाड ।रामभाऊ आवारे
(दै.महाभारत)

तुमच्या योगदानाचा मान, आमचा अभिमान! या संकल्पनेतून श्रमिक बहुउद्देशीय संस्था स्पेशल चाईल्ड मदर अवॉर्ड महिलादिन आणि मातृत्व दिनानिमित्ताने महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी आणि त्यांच्या मेहनतीला आदर देण्यासाठी आदरनीय आदर्श आई महिला मातेचा नारीरत्न पुरस्कार २०२५ या भव्य सोहळ्याचे आयोजन नाशिक नगरीत २२ एप्रिल रोजी सायंकाळी ४ ते ६ या कालावधीत करण्यात आले आहे

स्त्री ही केवळ कुटुंबाची आधारस्तंभ नाही, तर संपूर्ण समाजाची प्रेरणा आहे. तिच्या मेहनतीचा सन्मान करणे, हीच खरी प्रगती! हेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ११० कर्तृत्ववान महिलांना 'नारी रत्न ट्रॉफी' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे अशी माहिती श्रमिक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे आयोजक सौ वैशाली किशोर सपकाळे यांनी दिली आहे.तरी इच्छुक महिलांनी आपले प्रस्ताव व नाव नोंदणीसाठी ९८२२६३०९४४ या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. गौरविण्यात येणाऱ्या महिलांची क्षेत्रे स्पेशल चाईल्ड मदर , आरोग्य सेवा -समर्पित डॉक्टर व परिचारिका, शिक्षण क्षेत्र – समाज घडवणाऱ्या शिक्षिका, उद्योजकता – स्वकर्तृत्वावर यशस्वी उद्योग उभारणाऱ्या महिला, कला आणि सौंदर्य – नावाजलेल्या मेकअप आर्टिस्ट, या विभागातील ११० कर्तृत्ववान महिलांना 'नारी रत्न ट्रॉफी' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. नाव नोंदणीसाठी खालील माहिती अपेक्षित आहे नाव, व्यवसाय, कार्यक्षेत्र, पत्ता, संपर्क क्रमांक, या शानदार सोहळ्याचा भाग बनण्यासाठी नक्कीच सगळयांनी सामील व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# गेवराई शहरात एकही कुटूंब बेघर राहू नये याची काळजी घ्या- आ. विजयसिंह पंडित

## प्रधानमंत्री आवास योजना २.० चा आ. विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते प्रारंभ

गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

गेवराई शहरात एकही व्यक्ति किंवा कुटूंब बेघर राहू नये याची काळजी घ्या, ज्यांच्याकडे जागा नाही त्यांनाही घरकुल मिळेल असे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. सर्वांसाठी घर या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजना २.० चा गेवराई नगर परिषद अंतर्गत अंमलबजावणीचा शुभारंभ करतेवेळी आ. विजयसिंह पंडित बोलत होते. त्यांच्या शुभहस्ते व्यापारी गाळे धारकांना प्रातिनिधीक स्वरुपात चावी वितरीत करून गाळ्यांचा ताबा देण्यात आला. शहरातील अतिक्रमण धारकांना हक्काचा पीटीआर देणे बाबत आ.पंडित यांनी आढावा घेतला. यावेळी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित उपस्थित होते.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते गेवराई नगर परिषद अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना २.० या घरकुल योजनेच्या अंमलबजावणीचा शुभारंभ शुक्रवार, दि.४ एप्रिल रोजी करण्यात आला. यावेळी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, नायब तहसिलदार सोनवणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. शहरातील संजयनगर, भिमनगरसह आदी भागातील अतिक्रमण धारकांच्या हक्काच्या पीटीआर संदर्भातील सुरु असलेल्या प्रशासकीय प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. पीटीआर मिळणे बाबत १३४७ अर्जदारांनी पुराव्यासह अर्ज केले असून या महिना अखेर प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र अर्जदारांना हक्काचा पीटीआर मिळणार आहे. त्याचबरोबर गेवराई शहरात सर्वांसाठी घर या संकल्पनेची पारदर्शक अंमलबजावणी करून शहरात एकही कुटूंब बेघर राहणार नाही याची काळजी आपण घेऊ असे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी केले.

व्यापारी गाळ्यांच्या लिलावानंतर पूर्ण रक्कम भरूनही केवळ राजकीय द्वेषातून मागील अनेक वर्षांपासून व्यापारी गाळ्यांच्या ताब्यापासून वंचित असलेल्या व्यापाऱ्यांना दिलासा देण्याचे काम आ. विजयसिंह पंडित यांनी केले. व्यापारी गाळ्याच्या संदर्भात त्यांनी आवश्यक मान्यता शासन स्तरावरून मिळवून आज प्रातिनिधीक स्वरुपात गाळे धारकांना चावी देऊन व्यापारी गाळ्यांचा ताबा आ.पंडित यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी गाळे धारकांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. नगर परिषदेत आ. विजयसिंह पंडित यांनी प्रस्तावित शिवस्मारकाची जागा, क्रीडा संकुलातील विकासकामे, भुमिगत गटार योजना, संत नरहरी महाराज मंदिराच्या पीटीआर चा प्रश्न, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे लाभ, दिव्यांग निधीचे वितरण, कोल्हेर रोडवरील व्यापारी गाळ्यांचा प्रश्न, संजयनगर भागातील रहिवाशांचे प्रश्न यांसह विविध विषयांवर चर्चा करून नागरीकांचे प्रश्न सोडविले.

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, विधानसभा निवडणुकीनंतर गेवराई शहराच्या विकासासाठी सुमारे ११ कोटी ५० लक्ष रुपयांचा निधी मंजुर केला आहे. शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले शेकडो प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी आपण कटिबध्द असल्याचे सांगितले. प्रधानमंत्री आवास योजना २.० या घरकुल योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांनी कोणत्याही दलालांकडे पैसे देण्याची गरज नाही. नगर परिषदेने क्युआर कोड प्रसिध्द केला असून ऑनलाईन अर्ज केल्यास कोणतीही अडचण येणार नाही, त्यामुळे जास्तीत जास्त गरजु नागरीकांनी या घरकुल योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. यावेळी नगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी यांच्यासह शहरातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अर्थशास्त्र अभ्यासकाचा सन्मान: डॉ. राजधर टेमकर

**अहिल्यानगर / वजीर शेख**
**(दै.महाभारत)**

**कासार पिंपळगाव (आदिनाथनगर) येथील दादा पाटील राजळे शिक्षण संस्थेचे- दादा पाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय आदिनाथनगर, तालुका: पाथर्डी, जिल्हा: अहिल्यानगर येथे गेल्या ३४ वर्षांपासून अर्थशास्त्राचा अभ्यासक तथा अभ्यासू प्राध्यापक म्हणून, विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून,**

संशोधन लेख लिहिण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणारा अभ्यासू मित्र डॉ. सुभाष ज. देशमुख यांचे नुकतेच सातवे पुस्तक सहलेखक म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री नीलकंठ एस. देशमुख (संचालक: टॉपर्स क्लब अभ्यासिका आणि हॉटेल बॉन एपिटेट, सदाशिव पेठ, पुणे-३०) प्रकाशित झाले. त्यानिमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने लेखकास महाविद्यालयाचे नॅक समन्वयक डॉ.राजू त्रिंबक घोलप (इतिहास विभाग प्रमुख) यांच्या हस्ते शाल, पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.

राजळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रकाशनात अर्थशास्त्रासारख्या विषयाचे पुस्तक प्रकाशित करून रोवला गेला आहे. ही महाविद्यालयाच्या दृष्टीने भूषणावह बाब आहे.

# थोरात यांची अ भा मराठा महासंघाच्या मराठवाडा उपाध्यक्ष पदावरून कार्यमुक्त

बीड / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

अखिल भारतीय मराठा महासंघाच्या मराठवाडा उपाध्यक्ष पदावरून नारायणराव थोरात यांना मा.प्रमोद जाधव अखिल भारतीय मराठा महासंघ राष्ट्रीय कोषाध्यक्ष व मराठवाडा विभागीय अध्यक्ष मा गोपाळराव चव्हाण यांच्या आदेशावरून कार्यामुक्त केले आहे ,नारायण थोरात यांनी संपादक व पत्रकार यांच्या समोर,कै.आ. अण्णासाहेब पाटील संस्थापक अध्यक्ष अखिल भारतीय मराठा महासंघाच्या सार्वजनिक ठिकाणी आ शब्द वापरून अखिल भारतीय मराठा महासंघाचा अवमान केल्याप्रकरणी तातडीने अखिल भारतीय मराठा महासंघाचे मा.प्रमोद जाधव साहेब अखिल भारतीय मराठा महासंघ राष्ट्रीय कोषाध्यक्ष,व मराठवाडा



विभागीय अध्यक्ष गोपाळरावजी चव्हाण साहेब यांनी कार्यमुक्तीचा आदेश काढलाला आहे यापुढे अखिल भारतीय मराठा महासंघाच्या नारायणराव थोरात यांचा कुठलाही संबंध नाही अखिल भारतीय मराठा महासंघाच्या बीड जिल्ह्याच्या वतीने त्यांच्या शब्दाचा जाहीर निषेध करत आहे.

# बारहाते गल्लीतील मिरगीन जलकूंभ परिसराच्या सुशोभीकरण कामाचे डॉ. अकूंशराव लाडे यांच्या हस्ते शुभारंभ

मानवत / अनिल चव्हाण.
(दै.महाभारत)

मानवत शहरातील बारहात्ते गल्ली व मिरगीन जलकूंभ ( टाकी ) परिसराचे सुशोभिकरण कामाचे आज डॉ. अकूंशराव लाड यांच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. गेल्या अनेक महिण्यापासून या परिसरातील नागरिकांची बऱ्याच दिवसांपासूनची मागणी आज पूर्ण झाली. तर मोकळ्या जागेच्या ठिकाणी मजबूत सुरक्षा भिंत, लहान मुलांसाठी खेळणी ज्येष्ठ नागरिकां साठी वॉकिंग ट्रॅक, बसण्याची उत्तम व्यवस्था याठिकाणी करण्यात येणार आहे. यापूर्वी या परिसरात घाणीचे साम्राज्य होते. मोकाट जनावरे, अस्वच्छता, अंधारामुळे नागरिक त्रस्त होते. म्हणूनच या ठिकाणी गार्डन व कंपाउंड वॉल व्हावी अशी या भागातील नागरिकांची मागणी होती. या कामाचे उद्घाटन करताना आनंद होत असल्याचे मत डॉ. अकूंशराव लाड यांनी या वेळी व्यक्त केले आहे.

कार्यक्रमास मा. नगरसेवक गणेश कुमावत, विनोद रहाटे, शिवाजीराव पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे पाटील, ज्येष्ठ विधीज्ञ अनिरुद्ध पांडे सर, माजी नगरसेवक दत्ता चौधरी, मोहन लाड, ज्येष्ठ पत्रकार मोहनराव बारहाते, पत्रकार विलास भाऊ बारहाते, पप्पू भैया बारहाते, अशोक भाऊ बारहाते, रंगनाथराव बारहाते, श्रीधर कोकर, आजमभाई कुरेशी, रफिक भाई कुरेशी, हारून भाई कुरेशी, शकील भाई कुरेशी, अन्वर भाई बागवान, महबूब मंसूरी, कयूम भाई बागवान, सुभाष लेंगुळे, दगडोबा लेंगुळे, अमोल लेंगुळे, प्रकाश मोगरे, केशव पाटील, बिजू पाटील, गोपाळ दहे, प्रल्हादराव दहे, बालाजी दहे, हनुमान दहे, प्रभाकर दहे, नंदूभाऊ कच्छवे, गणेश दहे, प्रमोद राठोड, प्रदीप पेचफुले, गणेश गाजरे, नरेंद्र कुमावत, शिवनाथ कुमावत, भास्कर कुंभार, राहुल भदर्गे, शंकर तरटे, महादेव पानझाडे, बबन पानझाडे, आकाश गायकवाड, बालाजी गायकवाड, अमोल मेघळ, मोहनसिंग राजपूत, अशोक मगर, बालाजी गिराम आणि अनेक स्थानिक नागरिक उपस्थित होते. या कामामुळे परिसरात स्वच्छता, सुरक्षितता आणि नागरिकांसाठी सुंदर उपयुक्त जागा तयार झाली,



# पी एम श्री जिल्हा परिषद प्रशाला सावंगी बाजार येथे सीबीएससी अभ्यासक्रम वर्गाचे उद्घाटन संपन्न

खुलताबाद / हरिदास सराटे
(दै.महाभारत)

खुलताबाद तालुक्यातील सावंगी बाजार येथेआज दिनांक ७ एप्रिल २०२५ रोजी पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला सावंगी बाजार येथे नवीन शैक्षणिक धोरणानुसार बालवाटिका अर्थात नर्सरी ज्युनिअर केजी सीनियर केजी वर्गाचे तसेच शालेय शिक्षण विभागाच्या धोरणानुसार इयत्ता पहिली सीबीएसई वर्ग चे उद्घाटन करण्यात आले.

बाल वाटिकेसाठी खेळातून शिक्षण, हसत खेळत शिक्षण,



कारक कौशल्यांचा विकास, बालकाचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून ज्ञानरचनावादी पद्धतीने विकसित केलेल्या साहित्याच्या आधारे तयार केलेले साहित्य असलेल्या वर्गाचे उद्घाटन सरपंच आप्पाराव नलावडे सेवानिवृत्त उपशिक्षणाधिकारी पांडुरंग नलावडे मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे शिक्षक चतरसिंग परदेशी माजी सरपंच वसंतराव नलावडे, बीजेपी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे, नागरिक पुंजाजी नलावडे, शालेय समिती अध्यक्ष विठ्ठल नलावडे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच शाळेत नव्यानेच उपलब्ध झालेल्या स्ट्रॉनॉमी लॅब मधील आधुनिक शैक्षणिक साहित्याची पाहणी करण्यात आली. भूगोल विषयातील कठीण संकल्पना प्रत्यक्ष साहित्याच्या आधारे आता विद्यार्थ्यांना समजणे सोपे होईल, या साहित्यात पृथ्वीचे परिभ्रमन, परिवलन, दिवस-रात्र, ऋतू बदल, चंद्रग्रहण सूर्यग्रहण, अवकाशातील विविध घडामोडी निरीक्षण करण्यासाठी असलेली दुर्बिन, या प्रकारच्या विविध साहित्याचा समावेश आहे.

पीएमश्री योजनेत शाळेचा समावेश झाल्यामुळे शाळेत होत असलेल्या नवनवीन सुविधांबाबत गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले तसेच या साहित्याचा प्रभावीपणे वापर होण्यासाठी शिक्षकांना सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक पोपटराव काटकर , संतोष नलावडे, गोरख जाधव, भिकनराव घुले, सय्यदलाल, चांदखा पठाण तसेच ग्रामपंचायत सदस्य शालेय व्यवस्थापन समिती सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

# साईसेवा मतिमंद विद्यालयात आरोग्य तपासणी

शिर्डी / संजय महाजन
(दै.महाभारत)

आज दिनांक ७ एप्रिल २०२५ रोजी साईसेवा निवासी मतिमंद मुला मुलींची शाळा शिर्डी येथे जागतिक आरोग्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. जागतिक आरोग्य दिन हा जागतिक आरोग्य जागृती दिन आहे. जो दरवर्षी ७ एप्रिल रोजी जागतिक आरोग्य संघटना तसेच इतर संबंधित संस्थांच्या प्रायोजकत्वाखाली साजरा केला जातो. या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट आरोग्याबद्दल जागरूकता पसरविणे, आरोग्य सेवांचे दर्जा सुधारणे आणि जागतिक आरोग्य आव्हानांना तोंड देणे आहे हा दिवस जगभरात



विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, आरोग्य शिबिरे आणि जागरूकता मोहिमांद्वारे साजरा केला जातो.

या दिनाचे औचित्य साधून राजमाता जिजाऊ मल्टीपरपज मेडिकल फाउंडेशन शिर्डी ता. राहाता जि. अ. नगर संस्थेचे डॉ. श्री नचिकेत गोरक्षनाथ वर्पे यांसकडून साईसेवा निवासी मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.हा सर्व कार्यक्रम विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने यशस्वीरिता पार पडला.

# खेड येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाची सुरुवात




रुपेश देशमुख ब्रह्मपुरी / प्रतिनिधि

तालुका कृषी अधिकारी कार्यालय ब्रम्हपुरी तर्फे तालुक्यातील खेड (मक्ता) येथे नुकताच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोन ची मशाल फेरी काढून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाची ओळख करून देण्यात आली व प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना ची व सूक्ष्म नियोजनानंतर आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक सर्व बाबी याविषयी चर्चा करण्यात आली.यावेळी तालुका कृषी अधिकारी स्वाती घुले यांनी ग्राम कृषी विकास समिती व स्वयंसेवकाची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले.तर कृषी पर्यवेक्षक अमित केराम यांनी सदर प्रकल्पामध्ये कोणत्या बाबी समाविष्ट करण्यात येतात व आराखडा याविषयी मार्गदर्शन केले. तसेच प्रभारी मंडळ कृषी अधिकारी विनोद सोरदे यांनीही प्रकल्पाविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी सदर उपक्रामाला खेडच्या सरपंचा श्रीमती दीक्षा भजनकर,कृषी सहाय्यक कु.वैशाली ठवरे ,ज्योति गुरनुले,तेजिना चौधरी, परमेश्वर बंगाडे, सुनीता भोयर, शिल्पा वासनिक,कृषी पर्यवेक्षक लोकच सहारे व गावातील शेतकरी महीला बचत गट,तसेच शेकडो शेतकरी उपस्थीत होते.

# चोपडा तालुका सकल जैन समाजाच्या वतीने उद्या विश्वशांती नवकार दिवसाचे आयोजन

चोपडा / महेश शिरसाठ
(दै.महाभारत)

तालुक्याचे सकल जैन समाज यांचे वतीने आयोजित विश्वशांती नवकार दिवस ९ एप्रिल २०२५ रोजी साजरा करण्याचे योजिले असून त्यानिमित्ताने नवकार महामंत्रचे जप सकाळी आठ वाजून एक मिनिट ते नऊ वाजून ३६ मिनिटापर्यंत करण्यात येणार आहे कार्यक्रमाला माजी विधानसभा अध्यक्ष अरुणभाई गुजराती, आमदार चंद्रकांत सोनवणे, तहसीलदार भाऊसाहेब थोरात, व सर्व शासकीय अधिकारी, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, सर्व धर्मीय समाज बांधव उपस्थित राहणार आहेत

जुना शिरपूर रोड येथील विश्वनाथ जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी येथील कंपाउंड मध्ये नवकार जप चे आयोजन करण्यात आले असून जैन समाजाचे आबालवद्ध सहकुटुंब उपस्थित राहतील कार्यक्रम यशस्वीतेसाठी समाजाचे पदाधिकारी व कमिटी सदस्य चेतन टाटीया, दर्शन देशलहरा, पवन जैन, सौरभ जैन, मयुरेश जैन, राजस जैन, दीपक राखेचा, विशाल जैन, आदेश बरडीया, प्रवीण राखेचा आदी मेहनत घेत असून चोपडा वासियांना विश्वकल्याणासाठी उपस्थिती देण्याचे आवाहन केले आहे

# प्राथमिक शाळा उखळी येथे चावडी वाचन टप्पा २ उपक्रम संपन्न



जालना/प्रतिनिधी
(दै.महाभारत)

जालना तालुक्यातील सावंगी तलान येथे दिनांक ८ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उखळी केंद्र सावंगी तलान येथे शासन आदेश ५ मार्च २०२५ नुसार विद्यार्थ्यांचे पायाभूत साक्षरता व संख्यांज्ञान कौशल्य विकसित करण्यासाठी राज्यात निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत कृती कार्यक्रम अंतर्गत राज्यातील २ री ते ५ वि च्या वर्गातील शालेय विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी शालेय मुलांमध्ये १००% अध्ययन क्षमता विकसित करण्यासाठी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदरील उपक्रमात ग्रामस्थ,पालक तथा गावकऱ्यासमोर शालेय मुलांचे भाषा,इंग्रजी चे चावडी वाचन घेण्यात आले.शालेय मुलांना गणितीय क्रिया अधिक सुलभ होण्यासाठी संख्याज्ञान, पाढे पाठांतर व गणितीय क्रिया बाबत सराव घेण्यात आला.यावेळी उपास्थित पालकांनी शासनाच्या उपक्रमाचे कौतुक करून समाधान व्यक्त केले. गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता पाहून शिक्षकांचे अभिनंदन केले.सदरील उपक्रसाठी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था व जिल्हा परिषद जालना चे शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ,गटशिक्षणाधिकारी भरत वानखेडे,केंद्रप्रमुख भागवत जेटेवाड यांचे मार्गदर्शन लाभले.चावडी वाचन उपक्रमासाठी सुनील राठोड, विठ्ठल पवार,भगवान जाधव,राहूल जाधव,वंकर राठोड,अंगणवाडी सेविका मनीषा जाधव,मदतनीस सविता पवार, शाळेचे मुख्याध्यापक राहूल डासाळकर, सहशिक्षक नारायण माहोरे,गणेश जाधव उपस्थित होते.

# अंबाजोगाई तालुक्यात शासकीय कर्मचाऱ्यांकडून नागरिकांची अडवणूक थांबवा

## अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे उपजिल्हाधिकारी व तहसीलदारांना निवेदन



अंबाजोगाई / सालेम पठाण
(दै. महाभारत)

अंबाजोगाई तालुक्यात विविध शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून सुरू असलेली नागरिकांची अडवणूक तात्काळ थांबवा अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी उपजिल्हाधिकारी व तहसीलदारांना सोमवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर (बाबा) यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनानुसार बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी उपजिल्हाधिकारी व तहसीलदारांना सोमवार, दिनांक ७ एप्रिल रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अंबाजोगाई तालुका हा सुसंस्कृत तालुका असून हे शिक्षणाचे माहेरघर असल्याचे सर्वत्र बोलले जाते. आसपासच्या तालुक्यातील पाल्य व पालक येथे शिक्षणासाठी राहतात. अंबाजोगाई तालुक्यातील प्रशासकीय अप्रशासकीय कार्यालय सर्व शहरात आहेत. उपजिल्हाधिकारी, पंचायत समिती, तहसील, नगरपरिषद व इतर यापैकी काही कार्यालयामध्ये नागरिकांकडून पैसे घेऊन ही वेळेवर काम होत नाही. ग्रामीण व शहरी भागातला कोणत्या कार्यालयात एकदा गेला आणि काम झाले असे कधी होत नाही. सर्व प्रशासकीय व प्रशासकीय खात्यातील कर्मचाऱ्यांवर आपण अंकुश ठेवावा. तहसील कार्यालय व नगरपरिषद कार्यालयात काही तुरळक कर्मचारी कार्यालयीन कामात दिरंगाई दिसते. नको तिथे शुल्लक कामालाही खूप वेळ लावतात. तहसील या ठिकाणी तर ग्रामीण भागातील लोकांची मोठी हेळसांड होताना दिसते. कर्मचारी हे फोन न उचलणे, उचलला तर कामाचे काय झाले याबाबत व्यवस्थित न सांगणे हे आता थांबले पाहिजे, शासकीय अधिकारी हे जनतेचे नौकर आहेत. कोणत्याही नागरिकांचा फोन उचलणे व काम करणे ही जबाबदारी आहे, असे असताना ही या कर्मचाऱ्यांवर कोणाचाही अंकुश नाही असे दिसत आहे. प्रत्येक नागरिक तहसीलदार, सी.ओ, यांच्यापर्यंत पोहचू शकत नाही. यामुळे नागरिकांना नाहक त्रास होत आहे. या आधी आपणास निवेदनाद्वारे कळवले होते. ५०० रूपयांचा मुद्रांक (बॉण्ड) पेपर हा ५५०/५३० रूपयाला दिला जातो. यात नागरिकांची मोठी पिळवणूक होत आहे. आजही हीच परिस्थिती आहे. यात बदल कधी होणार. शेजारील जिल्ह्यामध्ये १०० रूपयांचा मुद्रांक (बॉण्ड) आज ही शासकीय कामकाजासाठी वापरणे सुरू आहे. फक्त आपल्या अंबाजोगाईत १०० रूपयांचा मुद्रांक (बॉण्ड) मिळत नाही, शासकीय कार्यालयात चालत नाही. तरी १०० रूपयांचा मुद्रांक (बॉण्ड) शासकीय कार्यालयात वापरणे सुरूच ठेवण्यात यावे कारण, शैक्षणिक कार्यालयीन कामासाठी विद्यार्थ्यांना अडचणी येत आहेत. याबाबत आपण वरिष्ठांना बोलावे ही विनंती आहे. तसेच 'मी माझ्या पगारात अत्यंत समाधानी आहे.' या आशयाचा फलक (बोर्ड) प्रत्येक शासकीय व शासकीय कार्यालयातील विभागात लागण्याची आज गरज दिसते. येत्या आठ दिवसांत आपण ते लावावेत. आपल्याला शक्य नसेल तर आमच्या संघटनेला फलक (बोर्ड) लावण्याची परवानगी द्यावी आम्ही स्वखर्चाने लावून देवूत. तरी मे साहेबांनी या प्रकरणी लक्ष देऊन समस्या सोडवाव्यात ही नम्र विनंती करून सहकार्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. सदरील निवेदनाच्या प्रतिलिपी १) तहसीलदार साहेब, तहसील कार्यालय अंबाजोगाई आणि २) मुख्याधिकारी साहेब, नगरपरिषद अंबाजोगाई यांना माहितीस्तव देण्यात आले आहे. सदरील निवेदनावर अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष ॲड.अरविंद मोटेगावकर, नानासाहेब गायकवाड, लहुजी शिंदे, इम्रान पठाण, ओमराजे चव्हाण, पांडुरंग देशमुख, धनंजय सुरवसे, विजयानंद सोळुंके यांच्यासह नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.




# गायरान जमीनीतुन अवैध गौण खनिज उपसा,विहीरीचे अनुदानही उचलले

परळी / विकास वाघमारे
(दै:महाभारत)

परळी तालुक्यातील सारडगाव येथे शेकडो एकर गायरान जमीन असुन या जमिनीवर अतिक्रमण करत अवैधपणे गौण खनिज उपसा व अधिकार्यांना हातशी धरत त्याच जमीनीवर शासकीय योजनेतून विहीर घेत अनुदान उचलले असुन याची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अन्यथा आत्मदहन करण्याचा इशारा याच गावातील युवक माणिक गंगाराम आंधळे यांनी दिला आहे.

परळी तालुक्यातील सारडगाव शिवारातील गट नंबर २१९,३९७,४२६,४५२,४८३,७४ आणि १०२ मध्ये ८३ हेक्टर ४९ गुंठे गायरान जमीन असुन यापैकी गट नंबर १०२ मधील गायरान जमीनीवर अतिक्रमण करत या जमीनीतुन मारोती गंगाराम आंधळे,श्रीमंत मारोती आंधळे,लक्ष्मी मारोती आंधळे यांनी तलाठ्याशी संगणमत करत अवैधपणे गौणखणीज उपसा केला.यातुन तयार झालेल्या खड्याला मनरेगा योजनेतील विहीर दाखवत १ लाख ५९ हजार ७४४ रुपयांचे अनुदानही उचलले आहे.याबाबत गावातील युवक माणिक आंधळे यांनी तक्रार करत चौकशी करण्याची मागणी करताच त्यांच्यावर इतर करणावरुन गुन्हा दाखल करण्यात आला.सदरील युवक यासंदर्भात २०२३ पासून लढा देत असुन अद्यापही या प्रकरणाची चौकशी झालेली नसल्याने माणिक आंधळे यांनी दि.७ एप्रिल रोजी गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना निवेदन देत या प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई केली नाही आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

# महाराष्ट्र वीरशैव लिंगायत रुद्र भूमी निवारण समितीची पहिली सभा शेगाव येथे संपन्न

परळी / विकास वाघमारे
(दै:महाभारत)

महान संत श्री गजानन महाराज यांच्या कर्मभूमी शेगांव, येथे महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा प्रणित महाराष्ट्र प्रदेश रुद्र भूमी समस्या निवारण समितीची प्रदेश कार्यकारिणीची पहिली बैठक शिवालय गेस्ट हाऊस शेगांव येथे अतिशय उत्साहात संपन्न झाली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी बुलढाणा जिल्हा वीरशैव लिंगायत सभेचे अध्यक्ष श्री अनिलआप्पा आवटी हे होते, तर व्यासपीठावर समितीचे अध्यक्ष श्री. महेशआप्पा शेटे. (अकोला) ,सचिव श्री. सुभाषआप्पा तोडकर (जळगाव), कार्याध्यक्ष श्री. विजयकुमार शाहीर (छ. संभाजीनगर), उपाध्यक्ष श्री. रामेश्वरआप्पा लांडगे (छ. संभाजीनगर ),म. वी.लिं. सभा. बुलढाणा,उपाध्यक्ष श्री. ज्ञानेश्वरआप्पा साखरे इ. उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते जगत ज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित असलेल्या समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आप आपला परिचय करून दिला. त्यानंतर सर्व पदाधिकाऱ्यांनी समितीच्या कार्याविषयी व कामकाजाविषयी आपापले मनोगत व्यक्त केले. महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा प्रदेश अध्यक्ष मा.श्री.रमेशआप्पा आवटे सर ,प्रकृतीच्या कारणामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र त्यांनी व्हिडिओ कॉल करुन सर्वांना मार्गदर्शन करून कार्यास शुभेच्छा दिल्या. सभेत खालील विषयांवर सविस्तर चर्चा करून ते सर्वानुमते मंजूर करण्यात आले. १ महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून रुद्र भूमी समस्येविषयी विहित नमुन्यात तक्रार/मागणी अर्ज मागवण्यात येतील. या कामी म.वी.लिं. सभेची तेथील स्थानिक जिल्हा व तालुका पातळीवरील कार्यकारणी मदत करेल. २हे सर्व मागणी अर्ज जिल्हा समस्या निवारण समितीकडे जमा करण्यात येतील. ३ जिल्हा समिती जमा झालेले सर्व अर्ज प्रदेश समितीकडे जमा करतील. ४ प्रदेश समिती,व कृती समिती, महाराष्ट्रातील संबंधित महसूल आयुक्तालयातील संबंधित अधिकाऱ्यांसोबत मीटिंग घेऊन, तेथील शासकीय अधिकाऱ्यांना अर्ज व निवेदन सादर करतील. ५ या सर्व शासकीय बाबींची व कागदपत्रांची पूर्तता करून त्याचा पाठपुरावा करण्यासाठी एक तज्ञांची कृती समिती नेमण्यात येईल, या समितीमध्ये सरकारी कामकाजाविषयी अनुभव असलेल्या व कायदेशीर बाबींची जाण असलेल्या अनुभवी व्यक्तींची नेमणूक करण्यात येईल.

६ दर तीन महिन्यांनी या सर्व समितींच्या कामांची आढावा बैठक घेण्यात यावी असे सर्वानुमते ठरले .७ आपली समस्या अतिशय जटिल व ज्वलंत असल्याने शासकीय व राजकीय पातळीवर याची गांभीर्याने दखल घ्यावी, यासाठी महाराष्ट्रातील सर्व वीरशैव लिंगायत बांधवांनी (जाती- पोट जाती )आपापल्या गावातून स्वतःच्या नावाने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्र फडणवीस यांना पोस्ट पत्राद्वारे ,ई-मेल, व्हाट्सअप, मेसेज द्वारे ११,१५१ पत्र किंवा मेसेजेस पाठवण्याचे सर्वानुमते ठरले.

आपल्या समाजातील आजी-माजी खासदार, आमदार ,मंत्री यांना सोबत घेऊन मुंबई येथे माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री व सबंधित विभागाचे अधिकारी इ. सोबत समितीच्या पदाधिकाऱ्यांची मीटिंग घेण्याचे ठरले. पहिल्या वर्षी प्रत्येक जिल्ह्यातून किमान २५ स्मशान भूमीचे प्रश्न मार्गी लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले .१० या कामी मार्गदर्शन करण्यासाठी समाजातील अनुभवी व ज्येष्ठ व्यक्तींची सल्लागार समिती नेमण्यात येईल. वरील सर्व विषयांना एक मताने मंजुरी देण्यात आली. यानंतर समितीचे अध्यक्ष श्री महेशआप्पा शेटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आपल्याला ही रुद्र भूमी विषयी कल्पना का व कशी सुचली ?याबद्दल सविस्तर विवेचन केले. तसेच पूर्ण महाराष्ट्रामध्ये विशेषतः विदर्भात हा प्रश्न किती गंभीर आहे, हे त्यांनी आकडच्या निशी सांगितले. या कामी समाजातील सर्व घटकातील जेष्ठ, युवक तसेच ग्रामीण व शहरी भागातील समाज बांधवांनी तन- मन व धनाने या कामी योगदान द्यावे, असे आवाहन केले.



समस्या निवारण समिती स्थापन करण्यासाठी म. वी.लिं. प्रदेश समितीचे अध्यक्ष श्री. रमेशआप्पा आवटेसर व प्रदेश सरचिटणीस श्री. चंद्रशेखर होनराव साहेब यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन लाभले, असे त्यांनी नमूद केले .व त्याबद्दल त्यांचे विशेष आभार व्यक्त केले. याप्रसंगी बुलढाणा जिल्हा म. वि. लिं. सभा उपाध्यक्षपदी श्री. ज्ञानेश्वर आप्पा साखरे यांची निवड करण्यात येऊन त्यांना जिल्हाध्यक्षांच्या व मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यानंतर समितीच्या सर्व सदस्यांना स्वतःचा फोटो, नाव, गाव व पद असलेले ओळखपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या मीटिंगसाठी श्री महादेवआप्पा ईटके,श्री विकासआप्पा हालगे, श्री. विकासआप्पा क्यावल, श्री. सुनीलआप्पा माटे, श्री. रमेशआप्पा केळकर, श्री. रविकांतआप्पा त्रकंठवार, श्री. प्रशांतआप्पा बोधेकर, श्री. शिवलिंगआप्पा खापरे, श्री पुरुषोत्तमआप्पा सोसे ,श्री. प्रफुल्ल कुमार शेटे, श्री. सुरेशआप्पा फिसके व अनेक समाज बांधव उपस्थित होते. श्री. प्रशांतआप्पा बोधेकर यांनी सूत्रसंचालन केले व आभार प्रदर्शन साखरे आप्पा यांनी केले.

# महाबोधी बुद्धविहार मुक्ती आंदोलनासाठी कामरगावात धरणे आंदोलन

वाशिम / हफीज खान
(दै.महाभारत)

कारंजा महाबोधी बुद्ध विहार मुक्तीसाठी कामरगाव येथे भारतीय लोकशाही संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश रामराव इंगळे यांच्या नेतृत्वात कामरगाव येथील आठवडी बाजारात धरणे आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात रामदास भोने,विनोदभाऊ पुंडलिकराव किर्दक, सुनिल शामरावजी थोरात,ज्ञानेश्वर नरुजी वानखडे, धम्मदिप महादेवराव वानखडे, प्रतिक दुर्योधन थोरात,मोहम्मद मुझीर राजा, नंदकिशोर विठ्ठलराव जवंजाळ, अजाबराव डोंगरदिवे, सुमेध बाळु वानखडे,धम्मपाल इंगळे यांच्यासह नागरिक सहभागी झाले होते. लाखो बौद्ध अनुयायांचे श्रद्धास्थान असलेले बिहार मधील बुद्धगया येथील महाबोधी बुद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे अशी मागणी या आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली.



बौध्द अनुयायांचे श्रध्देचे स्थान असलेले बिहार मधील बुद्धगया महाबोधी बुद्ध विहाराची सूत्र बी टी अँक्ट १९४९ रदद करून बौध्दांच्या ताब्यात देण्यात यावी. या ठिकाणी इतर धार्मिक लोकांचे बेकायदेशिर रित्या वर्चस्व प्रस्तापित असल्यामुळे बौध्द धार्मिक संस्कृतीचा - हास होत आहे. त्याच प्रमाणे प्रशासकीय अडचनीमुळे बौध्द बांधव त्यांच्या धार्मिक अधिकारा पासुन वंचीत होत असल्याचे दिसुन येत आहे. बौध्द अनुयायी महाबोधी बुध्द विहारची संपुर्ण मुक्ती आणि बौद्ध भिक्षू अनुयायांच्या ताब्यात बुध्द विहाराची सुत्रे देण्यासाठी देशामध्ये संघर्षमय वातावरण निर्माण झाले आहे. बुध्दगया येथील महाबोधी महाविहार हे संपूर्ण जगात बौध्दांकरीता पवित्र स्थान आहे. सध्यस्थीतीत बौध्द भिक्षु बांधव संविधानिक रित्या उपोषण आंदोलण करीत असून तेथील आंदोलन उपोषण बंद करण्याचा प्रयत्न बिहार प्रशासनाचा वतीने पोलीसांच्या माध्यमातून केला असून बौध्द भिक्षूना रात्री १ वाजता अज्ञान स्थळी नेवून आंदोलन उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला याचा आम्ही निषेद करतो हि व्यवस्था धार्मीक स्वातंत्र्याचे मोठ्या प्रमाणात उलंघण करीत आहे.

तरी बिहार सरकार तसेच देशाच्या सन्माननिय महामहिम राष्ट्रपती यांनी या विषयावर विषेश लक्ष देवून आंदोलन कर्त्यांच्या मागण्या पुर्ण करून देशाचा सन्मान वाढयावा अशा आशयाचे निवेदन राष्ट्रपतींना यावेळी पाठविण्यात आले.टैपल अँक्ट १९४९ रदद करून महाबोधी बुध्द विहार बौध्द बांधवाच्या, भिक्षु संघाच्या नियंत्रणात सदर विहाराची देखभाल देण्यात यावी. जेणे करून बौध्द संप्रदाय आणि बौध्द संस्कृती सुरक्षित व अबाधित राहील.इ.स. सहाव्या शतकामध्ये तथागत भगवान गौतम बुध्द यांचा जन्म बुध्दगया येथे झाला आहे. त्यामुळे बौध्द अनुयायांचे एकमात्र श्रध्देचे स्थान सदर बुध्दगया येथील महाबोधी बुध्द विहार आहे. देशातील बौध्द अनुयायी सदर ठिकाणी जाऊन आपल्या धार्मिक आस्थेला वाव देतात. भारतीय संविधानाने सुध्दा भाग ३ मध्ये कलम २५ ते २८ धार्मिक स्वातंत्राचे अधिकार दिले आहे. आणि म्हणुन बौध्द अनुयायांना त्यांचे पवित्र असलेल्या श्रध्देचे स्थळापासून वंचित ठेणारी कलम १९४९ अधिनियम खारीज करून सदर ठिकाणी बौध्द भिक्षु आणि बौध्द अनुयायी यांच्या ताब्यात महाबोधी बुध्द विहार देण्यात यावे.या करीता धरणे आंदोलन करण्यात आले.या धरणे आंदोलनात नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# औट्रम घाटात होणार ३ बोगद्यांचा महत्वाकांक्षी प्रकल्प

खासदार डॉ. भागवत कराड यांचा पुढाकार

खुलताबाद ।बाबासाहेब दांडगे
(दै:महाभारत)

छत्रपती जिल्ह्यातील कन्नड येथील औट्रम घाटात १५ कि.मी. लांबीचे ३ बोगदे उभारले जाणार असून, रेल्वे आणि रस्ते वाहतूक मंत्रालयाची ५०-५० टक्के असणार आहे.या प्रकल्पाच्या डी पी आर संदर्भात मंगळवारी (दि. ८ ) बैठक केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री मा.ना.श्री.नितीनजी गडकरी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री मा.ना.श्री.अश्विनीजी वैष्णव यांच्या प्रमुख उपस्थितीत दिल्लीत संपन्न झाली.

हा बोगदा प्रकल्प मराठवाड्याच्या प्रगतीसाठी एक मोठं पाऊल ठरणार आहे!याप्रसंगी माजी अर्थ राज्य मंत्री खासदार डॉ. भागवत कराड उद्योजक श्री.रामजी भोगले व श्री.विवेकजी देशपांडे यांची उपस्थिती होती.हा बोगदा व रेल्वे लाईन व्हावी यासाठी संघर्ष समिती अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब शिंदे यांनी मोठा संघर्ष केला होता. ..बोगदा व रेल्वे लाईन जाल्यास उत्तर व दक्षिण भारताचे दळणवळण अधिक सोईस्कर होणार आहे.



# सौताडा शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात

प्रा.एस खंडागळे /पाटोदा
(दै.महाभारत)

पाटोदा तालुक्यातील सौताडा जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सातारा या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन सौताडा जिल्हा परिषद माध्यमिक शाळा या ठिकाणी उत्साहात संपन्न झाले सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक गणेश बेद्रे सर हे होते तसेच वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाला जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे माजी शिक्षक फुले सर ,गावडे मॅडम ,जायभाय सर ,टेकाळे सर ,सरडे सर ,गुगळे सर , सरोदे सर आदी शिक्षकवृंद प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थिनी कावेरी नामदेव सानप यांनी केले तसेच २०१०/११ बॅचमधील विद्यार्थ्यांनी शाळेतील त्यांच्या कडु गोड आठवणींना उजाळा दिला, त्याचप्रमाणे शाळेत प्रवेश घेतल्यापासून शालांत परीक्षेला जाईपर्यंतचे अविस्मरणीय क्षण, अविस्मरणीय आठवणींना उजाळा दिला ,बालपणीचे सवंगडी, दोस्त,सखा ,जिगरी , मित्र, बालमित्र, बाल मैत्रीण अनेक वर्षानंतर भेटल्यानंतर अविस्मरणीय क्षण डोळ्यासमोर तरळल्याने विद्यार्थी भावुक झाले . शाळेत प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थी हा मातीचा गोळा असतो त्या मातीच्या गोळ्याला आकार,ऊकार देण्याचं पवित्र कार्य शिक्षक करत असतात आज आंम्ही जि प शाळेचे माजी असुन आज कुणी डॉक्टर, वकील, उद्योजक,शिक्षक , पोलिस, इंडियन आर्मी, पोस्ट मास्टर शेतकरी , मेकॅनिक, ड्रायव्हर, ऑपरेटर,कुक , तसेच विविध क्षेत्रांमध्ये नावलौकिक मिळवत आहेत ते सर्व शाळेतील शिक्षक जायभाय सर ,रानमारे सर, गावडे मॅडम,सरडे सर, गुगळे सर सरोदे सर, फुले सर यांच्या मार्गदर्शनामुळे झाले आहेत.त्या सर्व शिक्षकांना आंम्ही सर्व विद्यार्थी मनापासून धन्यवाद देतो व नमन करतो . प्रत्येक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले व सध्या कोणत्या क्षेत्रात किंवा पदावर कार्यरत आहे त्यासंबंधी माहिती दिली.तसेच शिक्षकवृंद यांनी यापूर्वी माजी विद्यार्थी यांनी स्नेहसंमेलन कार्यक्रम आयोजित केले परंतु हा पहिलाच कार्यक्रम आहे तो शाळेच्या आवारात आयोजन केला त्यामुळे अतिशय आनंद झाला व शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक.जि प शाळेचे माजी विद्यार्थी यांनी आपल्या शाळेसाठी,शाळेच्या प्रगती साठी, अडचणी दूर करण्यासाठी सहभागी झाल पाहिजे असे मत शाळेचे माजी शिक्षक रानमारे सर यांनी व्यक्त केले.तसेच फुले सर गावडे मॅडम जायभाय सर टेकाळे सर सरडे सर गुगळे सर सरोदे सर यांनीही मनोगत व्यक्त करणार ना माजी विद्यार्थ्यांचे विविध क्षेत्रातील नावलौकिक पाहून अत्याधंद होत असल्याचे त्यावेळी भावना व्यक्त केला तसेच विद्यार्थ्यांनी उद्योजक क्षेत्रामध्ये नोकरीमध्ये व्यवसायामध्ये शेतीमध्ये आपलं नाव कम शाळेचे व गावाचाही नाव लौकिक करावा

# पशूसंवर्धन विभागाचे काम अधिक गतीमान करण्यासाठी मंत्री पंकजा मुंडे यांचे महत्वाचे पाऊल

## पशुधन विकास अधिकाऱ्यांची २७९५ पदे भरणार

परळी / विकास वाघमारे
(दै:महाभारत)

पशुसंवर्धन विभागाचे काम पूर्ण क्षमतेने करण्यासाठी राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी महत्वाचे पाऊल उचलले असून विभागातील रिक्त पदे भरण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. त्याअंतर्गत पशुसंवर्धन सेवा गट अ मधील पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदे भरण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणी पत्र सादर करण्यात आल्याची माहिती पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली आहे.

ग्रामीण भागात पशुसंवर्धन विभागाचे काम गतीने व पूर्ण क्षमतेने होण्यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय



तसेच त्यांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील पशुधन विकास अधिकारी पद महत्त्वाचे आहे. सुधारित आकृती बंधानुसार महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट अ अंतर्गत पशुधन विकास अधिकारी संवर्गात एकूण ४६८४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी सद्यःस्थितीत १८८६ पदे भरलेली असून २७९८ पदे रिक्त आहेत. तसेच ३१ डिसेंबर २०२५ अखेर ८ पदे सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणार आहेत. असे एकूण २८०६ पदे रिक्त होणार आहेत. ही पदे रिक्त असल्याने कामकाजावर परिणाम होत होता. या गोष्टीची दखल घेत पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी पाठपुरावा करून पशुधन विकास अधिकारी संवर्गातील पदे भरण्याचा निर्णय घेतला. यापैकी सरळसेवा जाहिरात क्र. १२/२०२२ मधील प्रतिक्षायादीतील ११ पदे उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे. उर्वरित २७९५ पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणीपत्र सादर करण्यात आले आहे.

विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याचे निर्देश देण्यात आले असून लवकरात लवकर भरती प्रक्रिया राबविण्यात यावे, असे एमपीएससीला कळविण्यात आले आहे. ही रिक्त पदे भरल्यानंतर विभागाचे कामकाज अधिक वेगाने होऊन ग्रामीण भागातील पशुपालक तसेच शेतकरी बांधवांना चांगल्या दर्जाची सेवा उपलब्ध होईल, असा विश्वास श्रीमती मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.

# आमचा लढा न्यायासाठी-सुरज (भाऊ)लोखंडे

**किल्ले धारूर / अशोक सुरवसे**
**(दै.महाभारत)**

**धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण येथील भिल्ल समाजाला सामाजिक चळवळीने न्याय मिळवून दिला.मयत आसलेल्या भिल्ल समाजातल्या तरुणाला सार्वजनिक स्मशान भूमीत अंत्यविधी करण्यास अडवण्यात आले गावातील प्रस्थापित व्यक्तीने त्या भिल्ल समाजाच्या पिढ्या-पिढ्या अंत्यविधी करत आलेल्या जागेवर अतिक्रमण केले होते.भिल्ल समाजातील त्या व्यक्तीचे प्रेत धारूर तहसील कार्यालयात आणण्यात आले.**

सामाजिक चळवळीतील सर्वच कार्यकर्त्यांनी प्रशासनाला धारेवर धरुन भिल्ल समाजाची स्मशानभूमीची जागा अतिक्रमित व्यक्तीच्या ताब्यातून मुक्त करून भिल्ल समाजाच्या ताब्यात देऊन मयत संजय नामदेव माळी नामक व्यक्तीचा अंत्यविधी त्याच जागी करण्यात आला या वेळी धारूर तहसील कार्यालयाचे तहसीलदार निळे साहेब,धारूर पोलीसस्टेशनंचे पी.एस.आय.वाघमोडे साहेब आणि धारूर पंचायत समितीचे आधिकारी या सर्व अधिकाऱ्यांनी योग्य कारवाई करून सकार्य केले.हा खुप मोठा सामाजिक चळवळीचा संघर्ष होता आणि हा संघर्ष यशस्वी करण्यात सामाजीक कार्यकर्ते युवा नेते सुरज(भाऊ)लोखंडे,व्ही.बी.ए चे जिल्हाअध्यक्ष बाबुराव मस्के,नेते राणबा उजगरे,मानवी हक्क अभियानचे ता.अध्यक्ष किसन लोखंडे, डी.पी.आय चे ता.अध्यक्ष चंद्रसेन पाटोळे आणि आन्य सामाजिक कार्यकर्त्याचा मोलाचा सहभाग राहिला.

# अस्सल मराठवाडी भाषेत रंगणार चकलांब्यात वस्त्रहरण

## चैत्र पौर्णिमेनिमित्त श्री रोकडेश्वर जयंतीची जय्यत तयारी

बीड / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

गेल्या १४१ वर्षापासून अखंडितपणे पारंपारिक पद्धतीने चकलांबा या गावात चैत्र पौर्णिमेनिमित्त श्री रोकडेश्वर जयंती साजरी केली जाते यानिमित्त श्री रोकडेश्वर प्रसादिक नाट्य मंडळाचा नाट्य प्रयोग आयोजित केला जातो तीन दिवशीय असलेल्या या उत्सवासाठी रसिक प्रेक्षकांनी आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे

चकलांबा या गावात गेल्या १४१ वर्षापासून अखंडितपणे चैत्र पौर्णिमेच्या दिवशी सामाजिक कौटुंबिक ऐतिहासिक अशा विविध विषयावर नाट्यप्रयोगाचे आयोजन केले जाते विशेष म्हणजे हा नाट्य प्रयोग गावातील नाट्यकलाकारच मोठ्या तयारीने सादर करत असतात आणि ग्रामस्थांच्या वतीने ही या नाट्यप्रयोगाला मोठा प्रतिसाद मिळतो यावर्षी दिनांक ११ एप्रिल रोजी छबिना होणार असून यानिमित्त श्री रोकडेश्वर महाराजांची गावातून पालखी मिरवणूक काढली




जाणार आहे तर रात्री उशिरापर्यंत गावातील तरुणांच्या सहभागातून गंगेचे पाणी कावडीद्वारे आणून गावातील मंदिरात जलाभिषेक केला जातो, दिनांक १२ एप्रिल रोजी सूर्योदयाच्या समयी जयंती साजरी केली जाते तर दुपारी एक ते चार यादरम्यान महाप्रसादाचे आयोजन केले जाते पारंपारिक पद्धतीने चिठ्ठी टाकून यजमान निवडले जातात या यजमानांच्या हस्ते महारुद्राभिषेकही केला जातो सायंकाळी सात वाजता नाट्यप्रयोगाची सुरुवात होते प्रारंभी रोकडेश्वर पंचपदी होऊन मग नाट्यप्रयोगाला सुरुवात होत असते या पंचपदीमध्ये विदूषक सरस्वती गणपती आणि सूत्रधार आणि पंचपदी गायक यांचा समावेश असतो एक तासाच्या पंचपदीनंतर कलाकारांनी बसवलेले नाटक रसिक प्रेक्षकांसमोर सादर केले जाते, नाट्यप्रयोग संपल्यानंतर उत्तर रात्री श्री रोकडेश्वराची आरती करून रोकडेश्वर प्रसादिक नाट्य मंडळाच्या कलाकारांच्या वतीने दुसऱ्या दिवशी श्रमपरिहार केला जातो असा तीन दिवशीय उत्सव यावर्षी देखील होणार आहे यावर्षी गंगाराम गवाणकर लिखित आणि मच्छिंद्र कांबळी यांच्या कोकणी भाषेत सादर झालेल्या वस्त्रहरण या नाटकाचा प्रयोग अस्सल मराठवाडी भाषेत सादर होणार आहे हा नाट्यप्रयोग पाहण्यासाठी रसिक प्रेक्षकांनी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे

# पत्रकारांना अश्लील भाषेत शिवीगाळ करणाऱ्या वाळू माफियांवर गुन्हा दाखल

लातूर:श्रीकांत चलवाड
(दै:महाभारत)

लातूर :-मी वाळू वाला आहे असे सांगत पत्रकारांना अश्लील भाषेत शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या दोन वाळू माफियांविरुद्ध स्वामी विवेकानंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून हि घटना ४ एप्रिल रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. पत्रकार नेताजी जाधव हे अहिल्यादेवी होळकर चौक ते गरुड चौकाकडे जात असताना डीमार्टजवळ रस्त्याच्या कडेला स्कुटीवर थांबलेले दोन इसम अचानक त्यांच्या न्यूज चॅनलच्या वाहनासमोर आले दरम्यान अपघाताची कोणतीही घटना घडली नसतानाही संबंधित दोघांनी तू पत्रकार आहेस कि बे? तुला गाडी चालवायचं कळत नाही का? असे म्हणत अत्यंत खालच्या पातळीवर अश्लील शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. या




प्रकाराबाबत ५ एप्रिल रोजी पत्रकार नेताजी जाधव यांनी स्वामी विवेकानंद पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. *त्यावरून गुन्हा रजिस्टर क्रमांक २३४/२०२५ अन्वये भारतीय न्यायसंहिता २०२३ अंतर्गत कलम २९६, ३५२, ३५१(२), ३५१(३), ३(५) व मोटार वाहन कायदा १९९८ मधील कलम १८४ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तक्रारीची तात्काळ दखल घेत पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रेडेकर हे करीत असून, आज दि ८ एप्रिल रोजी आरोपींना अटक करून उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांच्या समोर सादर करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक पाटील यांनी दिली.या प्रकारा नंतर लातूर जिल्ह्यातील सुमारे ५० पत्रकारांचे शिष्टमंडळ पोलीस निरीक्षकांना भेटले. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी रणजित सावंत, पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, सुधाकर बावकर, दिलीप सागर, संतोष पाटील यांनी या प्रकरणाची तात्काळ दखल घेत कारवाई करत आरोपींचा शोध घेऊन गुन्हा दाखल केल्याने पत्रकारांच्या शिष्टमंडळातील सितम सोनवणे, लहू शिंदे, निशांत भद्रेश्वर, नितीन बनसोडे, विष्णू आष्टीकर, लिंबराज पन्हाळकर, श्रीकांत चलवाड,आनंद दणके खंडेराव देडे, हरिश्चंद्र जाधव, हारून सय्यद, सालार शेख, संदीप भोसले, सुनील कांबळे, अमोल घायाळ, संतोष सोनवणे, आनंद दणके, अजय घोडके, हारून मोमीन, के वाय पटवेकर, संजय गुच्चे, प्रकाश कंकाळ, धनराज वाघमारे, विशाल सूर्यवंशी, विकी पवार, अहिल्या कसपटे, दिनेश गिरी आदी पत्रकारांनी आभार मानले आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला परळीत मिळणार नवी कार्यकारिणी!

## पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी घेतली खा.बजरंग बप्पा सोनवणे व राजेंद्र मस्के यांची भेट

परळी / विकास वाघमारे
(दै:महाभारत)

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या परळी विधानसभा मतदार संघातील कार्यकारिणीला नवे शिलेदार मिळण्याचे संकेत आहेत. नवी कार्यकारिणी स्थापन करण्याच्या अनुषंगाने पक्षाच्या वरीष्ठ नेत्यांची सोमवारी चर्चा झाली. पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे तसेच जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांची भेट घेऊन पक्षाच्या संघटन बांधणीबद्दल सखोल चर्चा केली. त्यामुळे आता पक्षाच्या रिक्त असलेल्या पदांवर नव्या नियुक्त्या केल्या जाणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. आगामी काळात रचनात्मक बांधणी आणि धोरणात्मक काम करण्यासंदर्भात यावेळी या भेटीत चर्चा झाली. याप्रसंगी पक्षाचे नेते अंकुशराव ढोबळे, बाबासाहेब शिंदे, अक्षय मुंडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी पक्षाचे नेते राजेभाऊ फड सक्रिय झाले आहेत. सोमवार, दिनांक ०७ एप्रिल रोजी त्यांनी खा.बजरंग बप्पा सोनवणे व पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांची भेट घेऊन सखोल चर्चा केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा, देशाचे नेते शरदचंद्र पवार यांचा प्रेरक विचार घेऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी फौज मतदारसंघात उभी करणार असून, पक्षाला



बळकटी येईल अशा स्वरूपाचे काम करणाऱ्या आणि पक्षाशी निष्ठेने राहणाऱ्या कार्यकर्त्यांना पदाच्या माध्यमातून काम करण्याची संधी मिळणार असल्याचे त्यांनी यावेळी म्हटले आहे. सत्तेच्या विरोधात असलो तरी पक्षाला मानणारा मोठा वर्ग या मतदारसंघात पक्षाच्या पाठीशी आहे. त्यामुळे शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी युवक - युवती यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आगामी काळात धोरणात्मक काम करण्यात येणार आहे. तसेच भविष्यकाळात येणाऱ्या सर्व निवडणुकांना सामोरे जाण्यासाठी रचनात्मक बांधणी आणि धोरणात्मक काम करण्याची तयारी आम्ही ठेवली असल्याचे राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे. या भेटीप्रसंगी पक्षाचे नेते अंकुश ढोबळे, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, अक्षय मुंडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# इलेक्ट्रिक शॉक लागून मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून कार्यवाहीची मागणी

वाशिम / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

सविस्तर वृत्त असे की, सदर महिला वरील ठिकाणी राहत असून सदर तक्रारदार निता गोरख राठोड विधवा आहे. सदर महिलेला दोन मुली व एकच मुलगा होता व तो मजुरी करून माझ्या परिवाराचा पालन पोषण करत होता. दि. १०/०३/ २०२५. ला गैर अर्जदार सकाळी ७ ते ८ वाजता घरी आले व माझ्या मुलाला चल आपल्याला बाहेर जायचे आहे म्हणून घेऊन गेले मी माझ्या मुलास जाण्यास मनाई करत होती, तरी माझ्या मुलाला जबरदस्तीने मोटरसायकलवर बसवून घेऊन गेला. गैरअर्जदार यांचे माझ्या मुलाशी वर्तन चांगले नव्हते, माझ्या कुटुंबांशी गैर अर्जदाराचे वैरमनस्य होते यामधून माझ्या मुलाचा घातपात झाला ही माझी खात्री आहे. असे महिलेनी सांगितले आहे व माझी मुलगी सकाळी ९ वाजता किराणा दुकानात गेली असता दुकानदार म्हणाला की, तुझा भाऊ शेतामध्ये इलेक्ट्रिक शॉक लागून पडलेला आहे. माझी मुलगी लगेच घरी आली आणि मला




ही माहिती दिली माहिती मिळताच मी घटनास्थळी गेले असता, माझा मुलगा त्या ठिकाणी मृत अवस्थेत दिसला माझ्या मुलाचा घातपातानी मृत्यू झाला आहे यास जबाबदार गैर अर्जदार असून या घटनेच्या संपूर्ण वृत्तांत आहे सदर प्रकरणाची चौकशी करून गुन्हेगारावर गुन्हे दाखल करावे व माझ्या मुलाच्या मृत्यू कारणीभूत असलेल्या गैरहर्जदारावर कार्यवाही करावी करिता कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन येथे निवेदनाच्या माध्यमातून तक्रार अर्ज देण्यात आले आहे. व तक्रार अर्जात ६ ईसमांची तक्रार करण्यात आली आहे. कारंजा ग्रामीण पोलीस कधी कार्यवाही करणार याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

# संविधानाबद्दल जागृती निर्माण व्हावी, संविधान मूल्यांची जपणूक व्हावी या उद्देशाने ११ रोजी संविधान जागर

शिरोळ ।आनंदा शिंगे
(दै:महाभारत)

सामाजिक समतेचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले-डा.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करताना नागरिकांमध्ये संविधानाबद्दल जागृती निर्माण व्हावी, संविधान मूल्यांची जपणूक व्हावी या उद्देशाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती महात्मा जोतिराव फुले जयंती आणि २६ जानेवारी प्रजासत्ताक अमृत महोत्सवी वर्ष सन्मानार्थ कुरुंदवाड येथे ११ तारखेला सायंकाळी साडेपाच वाजता भारतीय संविधान सन्मान परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सन्मान परिषदेत देशातील सामाजिक आणि घटनात्मक प्रश्नांवर सडेतोड मते मांडणारे आणि सामान्य जनतेला त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणारे मुंबई उच्च न्यायालयाचे वकील असीम सरोदे हे सामाजिक न्याय,लोकशाही मूल्ये, संविधानाचे रक्षण, मानवाधिकार, सामाजिक प्रश्न, लोकशाहीच्या अडचणी, नागरी हक्क, युवकांची भूमिका या विषयांवर ते मार्गदर्शन करणार असल्याची माहिती संयोजक उमेश माळगे, यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दरम्यान ११ तारखेला संपन्न होणाऱ्या भारतीय संविधान सन्मान परिषदेला शिरोळ-हातकणंगले तालुक्यातून मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. शिरोळ तालुका व कुरुंदवाड शहर डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती,मुस्लिम सेट्रल कमिटी,राष्ट्र सेवा दल,दि मोहामेडन ट्रस्ट आणि साधना मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान सन्मान परिषदेच्या पार्श्वभूमीवर कुरुंदवाड पालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.बार असोचे अध्यक्ष अनिरुद्ध कांबळे,अरविंद धरणगुत्तीकर,मुस्लिम सेंट्रल कमिटीचे इकबाल पटवेगार,प्रफुल पाटील रमेश शिंदे ,माजी नगरसेवक राजू आवळे,तानाजी आलासे,आदी प्रमुख उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना आयोजक माळगे म्हणाले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उद्यान पंडित गणपतराव पाटील भूषवणार आहेत. स्वागताध्यक्षस्थानी ड. अनिरुद्ध कांबळे तर उदघाटन विजय चोरमारे व राजेंद्र कुंभार यांच्या हस्ते होणार आहे.११ तारखेला दुपारी तीन वाजता जयसिंगपूर येथून संविधान सन्मान मोटरसायकल रॅली निघणार आहे कुरुंदवाड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात रॅलीचे समारोप होऊन संविधान सन्मान परिषदेला सुरुवात होणार आहे.

# सुळकुड योजनेच्या अंमलबजावणीसाठी इचलकरंजी नागरिक मंच आक्रमक,आयुक्तांना आग्रही राहण्याचे निवेदन

इचलकरंजी / संभाजी गुरव
(दै:महाभारत)

इचलकरंजी शहरासाठी मंजूर झालेल्या सुळकुड पाणीयोजनेच्या अंमलबजावणीसाठी ठाम भूमिका घ्यावी, अशी मागणी करत इचलकरंजी नागरिक मंच तर्फे आयुक्त पल्लवी पाटील यांना आज निवेदन देण्यात आले. या निवेदनात योजनेबाबत झालेल्या संपुर्ण घडामोडींचा आढावा घेत सुळकुड हीच योजना योग्य असल्याचे ठासून सांगण्यात आले.तांत्रिक समितीच्या बैठकीत आपण सुळकुड योजनेच्या अंमलबजावणीसाठी आग्रही रहावे व तसेच म्हणणे ठामपणे मांडावे असे निवेदनाद्वारे सुचवण्यात आले.

सदर योजना२०२० मध्ये मंजूर झाली नोव्हेंबर २०२२ मध्ये अमृत २ मध्ये समावेश होऊन,त्यासाठी १६० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मात्र नदीकाठच्या काही गावांच्या विरोधामुळे व स्वार्थी राजकारणामुळे योजनेला अडथळा निर्माण झाला. २१ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून शासनस्तरावर तक्रारींचा सविस्तर अहवाल पाठवण्यात आला असून, त्यामध्ये सर्व गैरसमज व राजकीय विरोधाचे मुद्दे खोडून काढले आहेत.

निवेदनात, काळम्मावाडी धरणातील गळती सुधारण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे, आणि त्यानंतर पाणीसाठ्यात होणाऱ्या वाढीचा उल्लेख करून, सुळकुड योजना हीच उपयुक्त आणि तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण असल्याचा पुनरुच्चार करण्यात आला. तसेच, इतर पर्यायांमुळे भविष्यात अधिक अडथळे निर्माण होऊ शकतात, यावरही नागरिक मंचाने बोट ठेवले.

आमदार राहुल आवाडे आणि खासदार धैर्यशील माने यांच्याशी झालेल्या चर्चेचा उल्लेख करत, दोघांनीही सुळकुड योजनेसाठी ठोस भूमिका घेण्याचे आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली. बैठकीत उपस्थित सदस्यांनी, कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता ही योजना तातडीने राबवण्याची मागणी केली.

साठवण क्षमतेसाठी मार्ग निघू शकतो, २ वेळेला पूर्वव्यव्हारता




अहवाल देणारे आता नवनवीन मुद्दे का उपस्थित करत आहेत हा ही मुद्दा प्रभावीपणे मांडण्यात आला. आयुक्त पल्लवी पाटील यांनी देखील सुळकुड योजनेबाबत आग्रही भूमिका घेण्याचे आश्वासन दिले. सुरवातीला आयुक्त पल्लवी पाटील यांचे रोप देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी अमित बियाणी, राम आडकी, महेंद्र जाधव, जतीन पोतदार, सुषमा साळुंखे,राजेश बांगड,दीपक पंडित,रामचंद्र निमणकर,अभिजित पटवा आदि सदस्य उपस्थित होते.